नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## देशात कोरोनामुळे २४ तासांत ६ मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
देशात कोरोना विषाणूचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. सक्रिय रुग्णांची संख्या ३९७६ वर पोहोचली आहे. आरोग्य विभागाच्या वेबसाइटनुसार, १० दिवसांत १५ पटींनी वाढ झाली आहे. केरळमध्ये सर्वाधिक १४३५ रुग्ण आहेत. सक्रिय रुग्णांच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे ५०६ रुग्ण आहेत. कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या ३४ वर पोहोचली आहे. गेल्या २४ तासांत ६ मृत्यू झाले आहेत. सोमवारी अहमदाबादमध्ये १८ वर्षीय गर्भवती मुलगी आणि ४७ वर्षीय महिलेचा कोरोनामुळे मृत्यू झाला. यापूर्वी रविवारी दिल्लीत २२ वर्षीय मुलगी आणि तामिळनाडूमध्ये २५ वर्षीय मुलाचा कोरोनामुळे मृत्यू झाला.

* वर्ष १५ * अंक ३३७ * * गोंदिया * मंगळवार, दिनांक ३ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

# पावसाचा धांगडधिंगा

मे महिन्यात पावसाने महाराष्ट्रात कहर करून टाकला. मे महिन्यात आतापर्यंतच्या हिशोबा प्रमाणे साधारण अकरा ते बारा मिमी. पाऊस पडतो. हा पाऊस मे महिन्यात मात्र बरस- बरस बरसला. तो सरासरीच्या बाराशे पंचवीस टक्के अधिक पडला आहे. म्हणजेच यंदाच्या मे महिन्यात 150 पेक्षा जास्त मिमी. इतक्या पावसाची नोंद झालेली आहे. आता एवढा पाऊस पडल्यावर शेतकऱ्यांपासून सामान्य माणसापर्यंत सर्वांचेच धाबे दणाणले नाही तरच नवल. साधारण आपल्या महाराष्ट्रात फेब्रुवारी महिन्यात थंडी कमी होते आणि उन्हाळ्याची सुरुवात होते. मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यात उन्हाळा असतो. कधी तुरळक स्वरूपाचा वळीव पडला तर पडला. अन्यथा उन्हामुळे विदर्भात कोरड्या उन्हाचा मारा, नाशिक शहरात समतोल उन्हाळा आणि मुंबईत घामाच्या धारा लावणारा उन्हाळा आपण बघू शकतो, अनुभवू शकतो. तरीही अजून पावसाने तुरळकपणे आपली हजेरी सुरूच ठेवलेली आहे. आता महाराष्ट्रातच नाही. तर देशभरात पावसाचा जोर ओसरणार आहे. म्हणजे बंगालच्या खाडीतील हवेच्या दाबाचे क्षेत्र बांगला देशकडे जात आहे. त्यामुळे पूर्वोत्तर राज्यांमध्ये थोडा बहुत पाऊस पडेल आणि मग मान्सूनची गती कमी होईल. त्यानंतर आठ दहा दिवस पाऊस पडण्याची लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे मृगाचा पाऊस म्हणजेच मृग नक्षत्र जे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असते, ते धोकाच देणार आहे. हिमालयात एकापाठोपाठ एक निर्माण झालेले पश्चिमी विक्षोभ, राजस्थान आणि पाकिस्तानातील हवेची द्रोणीय स्थिती आणि बंगालच्या उपसागरातून त्यांना मिळणारे वारे आणि त्यात अरबी समुद्रातील बाष्पयुक्त वारे या सगळ्या वेगवेगळ्या गोष्टींच्या युती-स्थितीमुळे आतापर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणावर पावसाचा मारा झाला. आपल्या हवामान खात्याने 'मान्सून आला रे आला' अशी ग्वाही देऊन टाकली. या मे महिन्यात सरसकटपणे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. मुंबई शहरात तर उच्चांकच गाठला. मुंबईच्या सर्व उपनगरातही तसेच झाले. मुंबई जवळचे जिल्हे म्हणजेच रायगड, ठाणे, पालघर, कोकण प्रांत आणि पश्चिम महाराष्ट्र या भागात तर पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान केले. शेतकऱ्यांवर आलेले संकट आता फार मोठे आहे. कांद्याचे पीक वांद्यात आले. कोकणात झाडावर असलेले आंबे धडाधड खाली कोसळले. इतर ठिकाणी ज्वारी, मका, धान वगैरे उन्हाळी पिके पावसामुळे अक्षरशः नष्ट झाली. काही ठिकाणी वाहून किंवा सडून गेली. शेतकरी आतापर्यंत कर्जमाफीच्या आशेवर होते. तिथेच आज 'आस निरास भयी'. मग आता उन्हाळी पीक विकून खरीपाची पेरणी करण्याचे शेतकऱ्यांचे इरादे पावसाच्या पाण्यात वाहूनच गेलेले आहेत. या सर्व परिस्थितीसाठी केवळ पर्यावरणाला जबाबदार ठरवणे योग्य नाही, असे आम्हाला वाटते. आपण निसगासीबत लढाईच पुकारलेली दिसते. प्रत्येक नैसर्गिक वस्तू कशी अनैसर्गिक होईल याचा जणू आपण चंगच बांधलेला आहे. या सर्व परिस्थितीमुळे आता वारंवार सरकारकडे याचना करणे. एवढेच काम बाकी उरलेले आहे. आता पुढील पेरणी कधी होणार. हेही शेतक?यांना समजनासे झाले आहे. पेरणी केली आणि पाऊस आला नाही. तर महागडे बियाणे वाया जाऊ शकते. त्यामुळे एकूणच शेतकऱ्यांसाठी आता, इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सध्या सरकारला लाडक्या बहिणीला देण्यासाठी पैशाची जुळवाजुळव करणे कठीण झालेले आहे. त्यातच पुन्हा या नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी केंद्र सरकारकडे भीक मागण्याची पाळी आलेली आहे. पण केंद्र सरकार आधीच अर्थत्रस्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्याला तशीही केंद्राकडून सावत्रपणाची आणि सापत्न वागणूक मिळते. असा अनादी काळापासून म्हणजेच स्वातंत्र्य मिळाल्यापासून होणारा आरोप आहे. आपल्या तथाकथित श्रीमंत राज्याची व राज्यातील शेतकऱ्यांची अशी हीनदीन परिस्थिती आहे. त्यामुळे आता 'उघड दार देवा आता, उघड दार देवा' एवढीच करुणा भाकणे, आपल्या हाती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## आरसीबी की पंजाब किंग?

# आज फायनलचा थरार

### अहमदाबादला जाणाऱ्या विमानांचे भाडे २५ हजार : मेट्रो रात्री १२.३० वाजेपर्यंत धावणार

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २ :
आयपीएलचा अंतिम सामना मंगळवारी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल. अंतिम फेरीच्या समारोप समारंभाची थीम 'ऑपरेशन सिंदूर' असेल. तिन्ही दलांचे प्रमुख या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात. संपूर्ण स्टेडियम तिरंगी रोषणाईने सजवले जाईल आणि या वेळी गायक शंकर महादेवन यांचा लाईव्ह कॉन्सर्ट होईल.

ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी आणि हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांच्यासह इतर सेवा प्रमुख, अधिकारी आणि जवानांना अहमदाबादमध्ये आयपीएलचा अंतिम सामना पाहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

दरम्यान, रविवारी आयपीएलमध्ये रविवारी क्वालिफायर २ चा सामना मुंबई आणि किंग एलेव्हन पंजाब या संघात खेळला गेला . पंजाब किंग्जने मुंबई इंडियन्सचा ५ विकेट्सने पराभव केला. यासह, संघाने ११ वर्षांनंतर आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

यापूर्वी, संघाने २०१४ च्या हंगामातील विजेतेपदाचा सामना खेळला होता. आता अंतिम सामना ३ जून रोजी पंजाब आणि बंगळुरू यांच्यात खेळला जाईल. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने २० षटकांत ६ गडी गमावून २०३ धावा केल्या.
पंजाबने १९ षटकांत २०४ धावांचे लक्ष्य गाठले. कर्णधार श्रेयसने षटकार मारून संघाला विजयाकडे नेले. त्याने ४१ चेंडूत ८७ धावांची नाबाद खेळी केली. या खेळीत ५ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश होता. त्याला सामनावीर घोषित करण्यात आले.

श्रेयस व्यतिरिक्त नेहल वढेराने ४८ आणि जोश इंगलिसने ३८ धावा केल्या. अश्विनी कुमारने दोन विकेट घेतल्या. नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या मुंबईकडून तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी ४४-४४ धावांची खेळी केली. जॉनी बेअरस्टोने ३८ धावा केल्या. पंजाबकडून अझमतुल्लाह उमरझाईने २ विकेट्स घेतल्या.
दरम्यान, अंतिम सामन्याची देशभरात कमालीची उत्सुकता आहे.



**आरसीबी ९ वर्षांनी अंतिम फेरीत**

आयपीएलमध्ये पहिल्यांदाच कर्णधारपद भूषवणाऱ्या रजत पाटीदारने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला ९ वर्षांनंतर अंतिम फेरीत नेले. त्याच्या नेतृत्वाखाली, पहिल्यांदाच एखाद्या संघाने त्यांचे सर्व सामने जिंकले.
पाटीदारने स्पर्धेतील दोन मोठ्या संघांविरुद्ध, केकेआर आणि सीएसके विरुद्ध अर्धशतके झळकावली. त्याच्या नेतृत्वाखाली, संघाने हंगामात पहिल्यांदाच चेन्नईला २ सामन्यांमध्ये हरवले. तर क्वालिफायर-१ मध्ये पंजाबचा संघ १०१ धावांवर गारद झाला. या सामन्यात रजतने विजयी षटकार मारून आरसीबीला विजय मिळवून दिला. चाहत्यांना आशा आहे की आरसीबी ट्रॉफीसाठी त्यांची १७ वर्षांची प्रतीक्षा संपवेल.

**पंजाब किंग्ज (पीबीकेएस)**

कर्णधार श्रेयस अय्यरने संघाला गेल्या ५ वर्षात तिसऱ्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत नेले. २०२० मध्ये, दिल्लीने त्यांच्या नेतृत्वाखाली अंतिम सामना खेळला पण त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यानंतर २०२४ मध्ये, त्याच्या नेतृत्वाखाली, त्याने कोलकाताला अंतिम फेरीत नेले आणि त्यांना चॅम्पियनदेखील बनवले. आता पंजाबचे नेतृत्व करताना, त्याने ११ वर्षांनी संघाला प्लेऑफ आणि फायनलमध्ये नेले. पंजाबने शेवटचा अंतिम सामना २०१४ मध्ये खेळला होता, परंतु कोलकाताकडून त्याला पराभव पत्करावा लागला होता. श्रेयसच्या नेतृत्वाखाली पंजाबने स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात कमी धावसंख्येचा बचावही केला. पंजाबचा संघ आज आरीबीला कडवी झुंज देण्याच्या तयारीत दिसतो आहे.

**समारोप सैनिकांना समर्पित**

बीसीसीआय देशाच्या सशस्त्र दलांच्या शौर्य, धैर्य आणि निःस्वार्थ सेवेला सलाम करते. सैन्याप्रती कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून, आम्ही समारोप समारंभ सशस्त्र दलांना समर्पित करण्याचा आणि आमच्या वीरांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पंजाब-मुंबई सामन्याला स्लो ओव्हर रेटसाठी दंड



■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २ :
पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर आणि मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या यांना स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला आहे. अय्यरला २४ लाख रुपयांचा तर, हार्दिक पंड्याला ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

रविवारी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल क्वालिफायर-२ सामन्यात निर्धारित वेळेत पूर्ण षटके पूर्ण न केल्याबद्दल दोन्ही संघांना हा दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलच्या आचारसंहितेनुसार पंजाब किंग्जचा हा हंगामातील दुसरा गुन्हा होता, त्यामुळे अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. याव्यतिरिक्त, इम्पॅक्ट खेळाडूसह उर्वरित प्लेइंग इलेव्हन सदस्यांना ६ लाख रुपये किंवा त्यांच्या संबंधित मॅच फीच्या २५ टक्के, जे कमी असेल ते दंड ठोठावण्यात आला आहे.

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याला स्लो ओव्हर रेटसाठी ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलच्या १८ व्या हंगामातील मुंबईचा हा तिसरा स्लो ओव्हर होता. हार्दिक पंड्यासह उर्वरित प्लेइंग इलेव्हनसह प्रभावशाली खेळाडूंना १२ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या ५० टक्के (जे कमी असेल ते) दंड ठोठावण्यात आला आहे.

### एम्स नागपूरमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट उभारणीसाठी

## एनटीपीसीचा महत्त्वपूर्ण निधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
विदर्भासारख्या दुर्गम भागातील सिकल सेल आणि थायलेसिमिया ग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक उपचार मिळावेत, यासाठी आता नागपूरच्या एम्स रुग्णालयात बोन मॅरो ट्रान्सप्लांट (BMT) युनिट स्थापन होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून साकार झालेल्या या उपक्रमाला देशातील अग्रगण्य ऊर्जा कंपनी एनटीपीसीने सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) अर्थसहाय्य जाहीर करून मोठे योगदान दिले आहे.

सीएम फडणवीसांच्या संकल्पनेला पाठिंबा



**एम्स आणि एनटीपीसी यांच्यात सामंजस्य करार**

या प्रकल्पासाठी एम्स नागपूर आणि एनटीपीसी यांच्यात अधिकृत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या असून, या अंतर्गत एनटीपीसीकडून एमआयएचएएन, नागपूर येथील एम्स परिसरात बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिटची उभारणी केली जाणार आहे. रुग्णांसाठी अत्यावश्यक वैद्यकीय तपासण्या, औषधे, प्रत्यारोपणाची संपूर्ण प्रक्रिया, तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा यांचा खर्च एनटीपीसीच्या निधीतून केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एनटीपीसीच्या या योगदानाबद्दल कंपनीचे आभार मानत सांगितले, ह्हे केंद्र केवळ नागपूरसाठी नाही, तर संपूर्ण मध्य भारतातील गरजू रुग्णांसाठी, विशेषतः लहान मुले, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांसाठी आशेचा किरण ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिकल सेल आणि आनुवंशिक आजारांचे उच्चाटन हे राष्ट्रीय उद्दिष्ट ठरवले असून, हे केंद्र त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



## मिलिटरी कॅम्पवर कोसळली दरड

**३ ठार**
**६ जवान बेपत्ता**

■ वृत्तसंस्था, गंगटोक, दि. २ :
मुसळधार पावसानंतर सिक्कीममधील एका लष्करी छावणीवर भूस्खलन झाले. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला, ज्यांचे मृतदेह सापडले आहेत. सहा सैनिक बेपत्ता आहेत. लष्कराने सोमवारी या घटनेची माहिती दिली.
पीटीआय वृत्तसंस्थेने संरक्षण अधिका?याचा हवाला देत म्हटले आहे की, चार जणांना वाचवण्यात आले आहे, ज्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. बेपत्ता सैनिकांना शोधण्यासाठी शोध मोहीम सुरू आहे. गेल्या ४ दिवसांपासून सिक्कीमसह ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे.
पावसामुळे पूर आणि भूस्खलनात आतापर्यंत ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये आसाममध्ये १०, अरुणाचल प्रदेशात ९, मिझोरममध्ये ५ आणि मेघालयात ६ जणांचा समावेश आहे.

## एकदिवसीय क्रिकेटमधून मॅक्सवेल निवृत्त



■ वृत्तसंस्था, सिडनी, दि. २ :
ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याची एकदिवसीय कारकीर्द १३ वर्षांची होती. ३६ वर्षीय मॅक्सवेलने १४९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले.
३,९९० धावा केल्या आणि ७७ विकेट्स घेतल्या. त्याचा स्ट्राईक रेट १२६.७० होता. तथापि, तो सध्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळत राहील. मॅक्सवेलने २०१२ मध्ये ऑस्ट्रेलियासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तो २०१५ आणि २०२३ चा विश्वचषक जिंकणाऱ्या संघाचाही भाग होता.

२०२३ च्या विश्वचषकात मॅक्सवेलने अफगाणिस्तानविरुद्ध २०१* धावा केल्या. २०२३ च्या विश्वचषकात मॅक्सवेलने अफगाणिस्तानविरुद्ध २०१* धावा केल्या. सोमवारी निवृत्तीची घोषणा करताना मॅक्सवेल म्हणाला, मला असे वाटले की मी संघाला थोडे निराश करत आहे कारण माझे शरीर आता या स्वरूपाच्या मागण्या पूर्ण करण्याच्या स्थितीत नव्हते.

चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान बेलीशी बोललो मॅक्सवेलने मार्चमध्येच एकदिवसीय क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला होता. चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान, त्याने ऑस्ट्रेलियाचे मुख्य निवडकर्ता जॉर्ज बेली यांना सांगितले की त्याला वाटत नाही की तो २०२७ च्या विश्वचषकात खेळू शकेल.

भारताविरुद्धचा चॅम्पियन्स ट्रॉफीचा उपांत्य सामना हा त्याच्या एकदिवसीय कारकिदीर्तील शेवटचा सामना होता. ४ मार्च रोजी दुबईमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात मॅक्सवेल ७ धावा काढून अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला. मॅक्सवेल आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्जचा भाग होता पण दुखापतीमुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला.

## ११वी ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी नोंदणी अजूनही पूर्ण झालेली नाही? काळजी नको! शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा देत नोंदणीसाठी मुदत ५ जून २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत वाढवली आहे.

**आता विद्यार्थ्यांना ५ जून दुपारी २ वाजेपर्यंत संधी**

विद्यार्थ्यांना आणि पालकांना दिलासा देणारी ही घोषणा प्राचार्य शिक्षण संचालक (माध्यमिक) डॉ. श्रीराम पानझाडे यांनी आज अधिकृतपणे केली.

३१ मे २०२५ रोजी शासनाने दिलेले सुधारित आदेश, ज्यामध्ये इन-हाऊस कोट्याच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. या आदेशानुसार, खासगी व्यवस्थापनाच्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना १० टक्के जागा इन-हाऊस कोट्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इतर जिल्ह्यांमध्ये महसूली जिल्हानिहाय युनिटचे नियोजन करण्यात आले आहे.

## कुटुंब म्हणून आम्ही एकत्रच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
मागील काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. यावर बोलताना अजित पवार म्हणाले, आमचे विचार वेगवेगळे असले, तरी कुटुंब म्हणून सोबत असतो. घरातील कार्यक्रमाला आम्ही एकत्र येतोच.

घरातील कार्यक्रम असतील, तर त्याठिकाणी कुटुंब म्हणून आम्ही एकत्र येतोच. सुख-दुःखात एकमेकांसोबत असतोच, असे अजित पवार म्हणाले.

## धर्मगुरुने दिला होता अटारीमार्गे पाकमध्ये जाण्याचा सल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :
नागपूरच्या सुनीता जमगडे हिने पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडल्याच्या घटनेत एक माहिती समोर आली आहे.

सुनीताने याआधी दोन वेळा अटारी बॉर्डरमार्गे पाकिस्तानात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र दोन्ही वेळा ती अपयशी ठरली. या प्रकरणात एक महत्त्वाचा खुलासा झाला आहे, सुनीताला अटारी बॉर्डरमार्गे पाकिस्तानात जाऊ शकते, असा सल्ला एका पाकिस्तानी खिश्चन धर्मगुरूने दिला होता.
हा खिश्चन धर्मगुरू तिला भारतातील एका धार्मिक कायासाठी तयार करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप ग्रुपवर भेटला होता, असा दावा तिने तपास यंत्रणांकडे केला आहे. त्यामुळे आता तपास यंत्रणा या प्रकरणाचा सखोल छडा घेत असून, भारतामधील धार्मिक व्हॉट्सॲप ग्रुपवर पाकिस्तानातील हा धर्मगुरू कसा आणि कोणत्या हेतूने सामील झाला? या दिशेने तपास सुरू आहे.

पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडणाऱ्या नागपूरच्या सुनीता जमगडे हिच्या प्रकरणात आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सुनीताचा मुलगा, जो एलओसी ओलांडण्याच्या घटनेच्या वेळी तिच्यासोबत होता, त्याला आता काश्मीरमधून नागपूरात आणण्यात आले आहे. सुनीता १४ मे रोजी कारगिलजवळून एलओसी क्रॉस करून पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेली होती. त्या घटनेनंतर तिचा मुलगा कारगिल येथील बालकल्याण समितीच्या ताब्यात होता. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याला नागपूरला परत आणण्यात आले आहे. सुनीताने एलओसी ओलांडण्यामागील नेमके कारण काय होते आणि तिने कोणत्या पाकिस्तानी नागरिकाला भेटण्यासाठी ही कृती केली, याबाबत ती पोलिसांना सहकार्य करत नाही.



सुनीता जमगडे प्रकरणात नवा खुलासा

## उद्धव ठाकरेंच्या पक्षात ८ दिवसांत मोठा भूकंप

### मंत्री गिरीश महाजन यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सध्या जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे. या पक्षात पुढील ८ दिवसांत मोठा भूकंप होईल. त्यानंतर त्या पक्षात कोण राहणार व कोण राहणार नाही हे स्पष्ट होईल, असे सूचक विधान भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी केले. त्यांच्या या दाव्यामुळे ठाकरे गटात एकच खळबळ माजली आहे.

गिरीश महाजन म्हणाले की, संजय राऊत नाशिकमध्ये येऊन संघटनात्मक बैठक घेऊन गेले. पण त्यांच्या बोलण्यामुळे स्वतः उद्धव ठाकरेही बेजार झाले असतील. पण आता तो विषय आऊट ऑफ कंट्रोल झाला आहे. संजय राऊत एकटेच ठाकरे गट संपवण्यासाठी पुरेसे आहेत. त्याला इतरांची गरज लागणार नाही.
नाशिक शहर व जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपमध्ये येण्यासाठी उत्सुक आहेत. पुढे काय होते ते आठवड्याभरात स्पष्ट होईल. ८ दिवस थांबा. काही पक्ष अक्षरशः नेस्तनाबुत होतील, असे ते म्हणाले.

गिरीश महाजन यांनी यावेळी नाशिकच्या पालकमंत्रीपदावर भाष्य करातना आपण कुंभमेळा मंत्री असून, आपल्यावर मोठी जबाबदारी असल्याचे यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले. नाशिकच्या पालकमंत्रीपदाच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## कोकणात मनसेला बसणार धक्का!




**रत्नागिरी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला कोकणात मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकांमध्ये निराशाजनक कामगिरी असूनही सतत चर्चेत राहणाऱ्या राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील मनसेमधील अंतर्गत नाराजी आता उफाळून येताना दिसतेय. पक्षाचे सरचिटणीस वैभव खेडेकर हे पक्ष नेतृत्वावर नाराज असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. खेडेकर यांनी आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर जय महाराष्ट्र लिहून सूचक संदेशही दिला आहे. त्यांच्या या नाराजीमुळे ते लवकरच वेगळा निर्णय घेऊ शकतात, असे बोलले जात आहे. अलीकडेच रत्नागिरीतील एका कार्यक्रमात शिंदे गटाचे नेते रामदास कदम आणि उदय सामंत यांनी वैभव खेडेकर यांना थेट आपल्या पक्षात येण्याचे खुले आमंत्रण दिले होते. या कार्यक्रमात खेडेकर यांची उपस्थितीही विशेष लक्षवेधी ठरली होती. त्यानंतर लगेचच त्यांच्या नाराजीची चर्चा सुरू झाली.

हे प्रकरण केवळ वैभव खेडेकरपुरतेच मर्यादित नाही. यापूर्वी पुण्याचे ठसकेबाज नेते वसंत मोरे यांनीही मनसे सोडत पक्षाच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त केली होती. आता खेडेकर यांनीही तशाच प्रकारचा सूर आळवला आहे. विशेषतः पक्षातील जुन्या आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना योग्य वेळ किंवा महत्त्व दिले जात नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. वैभव खेडेकर यांनी आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर जय महाराष्ट्र लिहून सूचक संदेशही दिला आहे, ज्यामुळे दापोली-खेड परिसरातील राजकीय चर्चांना चांगलाच उधाण आले आहे. त्यांच्या या नाराजीमुळे मनसेसमोर कोकणात अस्तित्व टिकवण्याचे आव्हान उभे राहिले असून, पुढील काही दिवसांत त्यांचा निर्णय पक्षाच्या भवितव्यावर मोठा परिणाम करू शकतो.

## राज्यात आज ६५ नव्या कोरोनाबाधितांची नोंद : सर्वाधिक रुग्णसंख्या पुण्यात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** राज्यात कोरोनाचा धोका पुन्हा एकदा वाढताना दिसतो आहे. गेल्या 24 तासांत महाराष्ट्रात 65 नवीन कोरोनाबाधित रुग्ण आढळले असून राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या 506 वर पोहोचली आहे. यामध्ये सर्वाधिक रुग्ण पुणे (25), मुंबई (22), ठाणे (9) आणि पिंपरी-चिंचवड (6) या भागांमध्ये आढळले आहेत. यावर्षी जानेवारी महिन्यापासून कोविडमुळे एकूण 8 जणांचा मृत्यू झाला आहे.



राज्यात 1 जानेवारी 2025 पासून आतापर्यंत एकूण 11 हजार 501 कोरोना चाचण्या करण्यात आल्या आहेत. यापैकी 814 जणांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे. त्यातील 300 हून अधिक रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. मात्र सध्या 506 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

जानेवारीपासून आतापर्यंत महाराष्ट्रात कोविड-19 मुळे एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी सात रुग्णांच्या मृत्यूचे कारण त्यांना आधीपासून असलेल्या गंभीर आरोग्य समस्या होत्या. आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार, पहिल्या रुग्णाला हायपोकॅल्सेमिक झटके (हायपोकॅल्सेमिया) आणि नेफ्रोटिक सिंड्रोमचा त्रास होता. दुसरा रुग्ण कर्करोगाने ग्रस्त होता. तिसऱ्या रुग्णाला स्ट्रोक (सेरेब्रोव्हस्कुलर रोग) झाला होता आणि त्याला झटके येत होते. चौथ्या रुग्णाला डायबेटिक केटोॲसिडोसिस आणि लोअर रेस्पीरेटरी ट्रॅक्ट इन्फेक्शन होते. पाचव्या रुग्णाला इंटरस्टिशियल फुफ्फुसांचा आजार होता.

सहावा रुग्ण मधुमेहाने ग्रस्त होता आणि 2014 पासून तो अर्धांगवायूने ग्रस्त होता. सातवा रुग्ण गंभीर तीव्र श्वसन त्रास सिंड्रोम (एआरडीएस) आणि डायलेटेड ऑर्टिक रिगर्जिटेशनने ग्रस्त होता. आठवा रुग्ण 47 वर्षीय महिला होती जिला ताप आणि श्वास घेण्यास त्रास होत असल्याची तक्रार होती.

दरम्यान, देशातही कोरोनाचे रुग्ण सातत्याने वाढत आहेत. देशातील कोरोना रुग्णांची संख्या ३ हजारांच्या पुढे गेली आहे. रविवारी सकाळपर्यंत, भारतात कोरोना रुग्णांची सध्याची संख्या 3 हजार 395 होती. यामध्ये सर्वाधिक प्रकरणे केरळमधून येत आहेत. रविवारी सकाळपर्यंत केरळमध्ये 1 हजार 336 सक्रिय रुग्ण होते.

देशभरात कोरोनाचा संसर्ग वाढत असतानाच, महाराष्ट्रातील आरोग्य विभाग देखील अलर्ट मोडवर आहे.

## मी हार मानणारा माणूस नाही रामराजे नाईक निंबाळकर



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर यांनी आपल्या राजकीय विरोधकांवर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. मागील 30 वर्षे संघर्ष करून मी फलटण तालुक्यात आणी आणले. आम्ही मतांसाठी नव्हे तर जनतेसाठी काम केले. आज जे आम्ही हे केले, ते केले असे म्हणतात, त्यांच्या 90 टक्के कामांचा पाया मी घातला आहे, पण आज ते कळस लावायला पुढे आहेत, असे ते म्हणालेत. रामराजे नाईक निंबाळकर फलटण तालुक्यातील कुरवली येथे बाणगंगा धरणाच्या जलपुजनावेळी बोलत होते. ते म्हणाले, कार्यकर्त्यांनी साथ दिल्यामुळे आम्ही शून्यातून राजकारण निर्माण केले. आमच्याकडे एकही माणूस नव्हता. इथल्या लोकांनी व कार्यकर्त्यांनी आम्हाला उचलून धरले. माझ्या वयाचे कार्यकर्ते आता थकलेत. पण आता मी स्वतः काही ना काही कारणाने बाहेर पडणार आहे.

निंबाळकर पुढे म्हणाले, विधानसभेला आपल्या उमेदवाराला 10-12 हजार मतांनी पराभव पत्करावा लागला. पण राजकारणातील आपला पाया अजूनही मजबूत आहे. मी हार मानणारा माणूस नाही. काहीही करून जनतेच्या मदतीने बिघडलेली राजकीय परिस्थिती बदलणारच. मोठ्या कष्टाने बसवलेली तालुक्याची घडी विस्कटू देणार नाही.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यात दोन शहराध्यक्ष

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) पक्षविस्तार करण्याच्या दृष्टीने शहर कार्यकारिणीच्या रचनेमध्ये बदल करताना दोन शहराध्यक्षांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार पूर्व भागासाठी माजी आमदार सुनील टिंगरे, तर पश्चिम विभागाच्या शहराध्यक्षपदी माजी सभागृहनेते सुभाष जगताप यांची नावे रविवारी जाहीर करण्यात आली.



कल्याणीनगर येथील पोर्शे कार अपघात प्रकरणात फटका बसलेले टिंगरे यांचे यानिमित्ताने पुनर्वसन करून त्यांना ताकद देण्याचा प्रयत्न झाला असून, जगताप आणि कार्याध्यक्षपदी हाजी फिरोझ शेख यांची नियुक्ती करून जातीय समीकरणे जुळविण्यात आली आहेत.

दरम्यान, या दोन शहराध्यक्षांच्या मदतीला प्रदीप देशमुख, रूपाली ठोंबरे, हाजी फिरोझ शेख आणि अक्रूर कुदळे या चौघांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांच्यावर समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर त्यांनी या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे या पदासाठी सुनील टिंगरे, सुभाष जगताप यांच्यासह आमदार चेतन तुपे, माजी महापौर दत्तात्रय धनकवडे, प्रदीप देशमुख यांची नावे चर्चेत होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनापूर्वी नव्या शहराध्यक्षांची नियुक्ती होईल, असे पक्षाकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार पक्षाचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन शहराध्यक्षांची नियुक्ती करून धक्कातंत्र राबविले आहे.

आगामी महापालिका निवडणूक आणि पक्ष विस्तार करण्याच्या दृष्टीने शहर कार्यकारिणीच्या रचनेत बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार पूर्व भागातील कसबा, पुणे कॅन्टोन्मेंट, हडपसर आणि वडगावशेरी या चार विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सुनील टिंगरे यांना देण्यात आली आहे. तर या विभागाच्या कार्याध्यक्षपदासाठी रूपाली ठोंबरे आणि हाजी फिरोज शेख यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

पश्चिम विभागातील पर्वती, खडकवासला, कोथरूड आणि शिवाजीनगर या मतदारसंघांच्या शहराध्यक्षपदी सुभाष जगताप यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मदतीला प्रदीप देशमुख आणि अक्रूर कुदळे हे कार्याध्यक्ष असणार आहेत.

## सिगारेट न दिल्याने तरुणाचा खून

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** सिगरेट पिण्यासाठी मागितल्यावर ती न दिल्याचा रागातून एका 25 वर्षीय तरुणाच्या डोक्यात सिमेंटचा ब्लॉक मारुन त्याचा निघृण खून करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार पिंपरी चिंचवड मधील विठ्ठलनगर परिसरात घडला आहे. अक्षय संजय ठोके (वय- 25रा. साईकृपा हौसिंग सोसायटी, विठ्ठलनगर, पिंपरी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी संततुकारामनगर पोलिस स्टेशन मध्ये आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याबाबत आरोपी विश्वास भिमा शिंदे (वय- 28,रा. विठ्ठलनगर, नेहरुनगर, पिंपरी) याचेवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयताची आई वंदना संजय ठोके (वय- 45) यांनी आरोपी विरोधात पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. अक्षय ठोके हा राहते घराचे साईकृपा हौसिंग सोसायटी इमारतीच्या पार्किंग मध्ये उभा असताना, त्यास सदर ठिकाणी असलेल्या आरोपी विश्वास शिंदे याने सिगारेट पिण्यास मागितली. परंतु ती न दिल्याचा रागातून त्यांच्यात जोरदार भांडण होऊन मयत याने आरोपीला सिमेंट ब्लॉक मारुन फेकला परंतु तो आरोपीने चुकवला. त्यानंतर आरोपीने त्रिकोणी आकाराचा सिमेंट ब्लॉक मयताचे डोक्यात तीन ते चार वेळा मारुन जिवे ठार मारले आहे. याबाबत पुढील तपास पोलिस निरीक्षक गोरख कुंभार करत आहे.

पिंपरी चिंचवड पोलिस ठाण्याचे अंर्तगत तळेगाव दाभाडे परिसरात जुना पुणे- मुंबई हायवे लगत निलया सोसायटी जवळ तीनजण संशयित एका कार मध्ये फिरत असून त्यांच्याकडे शस्त्र असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांचे पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून सियाझ कार मधून तीनजणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून पाच लोखंडी पिस्टल व 20 जिवंत काडतुसे मिळून आली आहे.

सदर शस्त्र बाळगण्यास मनाई असताना त्याबाबत कोणताही कायदेशीर परवाना नसताना शस्त्र अवैधरित्या दहशत माजविण्याकरिता व विक्रीकरिता बाळगल्याने आरोपी उमेश चंद्रकांत केदारी (वय- 28,रा. पुनावळे,पुणे), मंथन अशोक सेंतकर (28,रा. कान्हे, ता.मावळ,पुणे), व विशाल ज्योतिराम खानेकर (30,रा. मोहितेवाडी, ता.मावळ,पुणे) या आरोपींवर तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धनकवडीत विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** धनकवडी परिसरात एका दुर्दैवी घटनेत ३५ वर्षीय विवाहिता वर्षा तुकाराम रणदिवे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या सतत छळाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

व्यंकटेश अपार्टमेंटसमोर, गोविंदराव पाटीलनगर, धनकवडी येथे राहणाऱ्या वर्षा यांनी २४ मे रोजी आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. या प्रकरणी मृत महिलेचे पती तुकाराम रणदिवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरोपींमध्ये उज्वला बागाव (५०), तिचा मुलगा योगेश (३५), मुली वैशाली (३२) आणि सुवर्णा (२५) यांचा समावेश आहे. उज्वला ही फिर्यादी तुकाराम रणदिवे यांची बहीण असून, दोन्ही कुटुंबे शेजारी राहतात. या चौघांनी वर्षा यांना सतत टोमणे मारून त्यांचा मानसिक छळ केला. सुरुवातीला पोलिसांनी या प्रकरणाची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून केली होती. मात्र तुकाराम रणदिवे यांनी नंतर केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी केलेल्या तपासात छळामुळे आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आरोपींविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## माजी पोलीस उपायुक्तांच्या सुनेची फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** मुंबई पोलीस दलातील माजी पोलीस उपायुक्ताच्या सुनेला सायबर भामटयांनी दीड लाखांचा गंडा घातला आहे. परदेशात जाण्यासाठी त्यांच्या सुनेने इंटरनेटवर एका कंपनीचा शोध घेऊन बुकींग केले होते. मात्र प्रत्यक्ष परदेशात गेल्यावर फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी एमएचबी पोलीस ठाण्यात सायबर भामट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजी पोलीस उपायुक्त अंबादास पोटे हे बोरीवलीत आपल्या पत्नी, मुलांसमवेत राहतात. त्यांनी एमएचबी पोलीस ठाण्यात दिलेल्या फियार्दीनुसार उन्हाळी सुट्टी असल्याने त्यांचा मोठा मुलगा अतुल आणि त्याची पत्नी चित्रगंधा पोटे (३२) यांनी दोन्ही मुलांसह परदेशात सहलीसाठी जाण्याचा बेत आखला होता. त्यासाठी त्यांनी स्वस्त बुकींग करून देणाऱ्या ट्रॅव्हल कंपनीचा ऑनलाईन शोध घेतला. त्यावेळी त्यांना केनील ट्रॅव्हल्स नावाची कंपनी आढळली. त्यांच्या नियोजित सहलीसाठी ४ जणांना २ लाख रुपये खर्च येईल, अशी माहिती ट्रॅव्हल्स कंपनीने दिली. त्या ट्रॅव्हल्स कंपनीचे दर स्वस्त असल्याने त्यांनी या कंपनीद्वारे परदेश सहल करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार ७ एप्रिल रोजी चित्रगंधा पोटे यांनी विमान तिकिटासाठी ८८ हजार रुपये आणि २१ एप्रिल रोजी १ लाख १२ हजार रुपये केनील ट्रॅव्हल्सच्या बॅंक खात्यावर पाठवले. त्यानंतर ट्रॅव्हल कंपनीने त्यांना परदेशातील हॉटेलमध्ये बुकींग नक्की झाल्याचे पत्र (कन्फर्मेशन लेटर) व्हॉटसअपवर पाठवले. १७ मे रोजी चित्रगंधा पोटे, त्यांचे पती अतुल आणि दोन्ही मुले हॉटेलमध्ये गेले असता त्यांच्या नावाने कुठलेच बुकींग नसल्याचे समजले. ट्रॅव्हल कंपनीने त्यांना हॉटेलचे बनावट कन्फर्मेशन पत्र पाठवले होते. परतीचे विमान प्रवासाचे तिकीटही रद्द करण्यात आले होते. ट्रॅव्हल्स कंपनीचा मालक अखिलेश सिंग याचा फोनही बंद झाला होता. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर चित्रगंधा यांनी स्वतःकडील पैसे भरून नव्याने हॉटेलमधील खोली बुक केली. त्यानंतर त्यांना दुसऱ्या विमानाचे तिकिट काढून भारतात परतावे लागले.

## स्वार्थी नेत्यांना जनता यंदा धडा शिकवेल आमदार दळवींचा तटकरेंवर घणाघात



**महाड :** सगळं काही स्वतःच्या पदरात पाडून घेण्याची सवय ही सुनील तटकरे यांची जुनीच आहे. ज्यांना आजवर मालकत्व मिळवता आले नाही, त्यांनी रायगडच्या पालकत्वाची भाषा करु नये, असा घणाघात शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर केला.

मंत्री भरत गोगावले यांच्या महाड येथील वाढदिवस सोहळ्यात दळवींनी मंचावरून थेट तटकरे यांच्यावर आरोपांचे बाण सोडले. ते म्हणाले, तुम्ही मालकत्व मिळवले असतं, तर पालकत्व मागण्याचा नैतिक अधिकार असता. पण आज रायगडचे खरे हितचिंतक कोण, हे जनता जाणते.

सुनील तटकरे यांनी काही दिवसांपूर्वी भरत गोगावले यांच्या नॅपकिन स्टाइलची खिल्ली उडवली होती. यावर प्रत्युत्तर देताना दळवी म्हणाले, गोगावले खांद्यावर नव्हे तर काखेत नॅपकिन घेतात. खांद्यावर नॅपकिन ही वाईट प्रसंगात घेतली जाते. त्यामुळे नक्कल करण्याआधी माहिती असणे गरजेचे आहे. लोकसभा निवडणुकीसाठी आम्ही तन-मन-धन बाजूला ठेवून तटकरे यांच्यासाठी काम केले. पण ते निवडून आल्यानंतर त्यांनीच जात दाखवली. अशा स्वार्थी नेत्यांना जनता यंदा धडा शिकवेल.

आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, आगामी निवडणुका महायुतीच्या तिकिटावरच लढणार आहोत. मात्र, या महायुतीत सुनील तटकरे नावाच्या महाभागाचा लवलेशही कुठे दिसणार नाही.

## 'सिमी'शी संबंधित साकिब नाचनच्या घरावर छापा

### ठाणे येथे एटीएसची कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. २ :** मुंबईत 2002-03 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटप्रकरणी शिक्षा भोगून तुरुंगातून सुटलेला साकिब नाचन पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने सकाळी पडघा (ता. भिवंडी) येथे नाचनच्या घरावर छापा टाकून तपास सुरू केला आहे.



नाचनच्या घरातून काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, नाचनने तुरुंगातून सुटल्यानंतर काही तरुणांना कट्टर विचारसरणीकडे वळवण्याचा प्रयत्न केला. तो पडघा परिसरात गुप्त शस्त्रप्रशिक्षण देत असल्याची माहितीही तपास यंत्रणांना मिळाली आहे. देशविघातक कृत्य कुठेही घडले की अनेकदा तपासाची सुई भिवंडीतील पडघ्यापर्यंत येऊन पोहचते. मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात पोलिसांनी या भागात राहणारा साकिब नाचन याला काही वर्षांपूर्वी अटक केली होती. तेव्हापासून पडघा नेहमीच चर्चेत राहिला. आज एटीएसकडून साकिब नाचन याच्या घराची झडती घेण्यात आली आहे.

या ऑपरेशनमुळे संपूर्ण गावात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. परिणामी, गावाने अक्षरशः छावणीचे रूप धारण केले आहे. सकाळपासूनच अनेक संशयित व्यक्तींच्या घरांवर एटीएसची छापेमारी सुरू आहे. याच गावातून कुख्यात साकिब नाचन, त्याचा मुलगा आणि 'आयसिस'शी संबंधित दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या 16 जणांना अटक करण्यात आली होती. याशिवाय पुण्यातील एका गंभीर प्रकरणात या गावातूनच चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते. सध्या सुरू असलेल्या ऑपरेशनमध्ये नेमके किती जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. एटीएस अधिकारी यासंदर्भात कोणताही खुलासा करण्यास टाळाटाळ करत आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त पाहायला मिळत आहे.

या प्रकरणी याआधी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (ठक्ष) पडघा, भिवंडी, ठाणे, पुणे आणि बेंगळुरू येथे एकाचवेळी छापे टाकले होते. त्या छाप्यांमध्ये साकिब नाचनसह आणखी काही जणांच्या घरातून शस्त्रे, मोबाइल फोन्स, लॅपटॉप्स, हार्डडिस्क्स आणि मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम सापडली होती. काही ठिकाणी हमास या जिहादी संघटनेचे झेंडेही आढळून आले होते.

## उत्तरप्रदेशच्या दोन आरोपींना खडकी पोलिसांकडून अटक

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** उत्तरप्रदेश येथून विमानाने पुण्यात येऊन पुणे शहरातील नाना पेठ परिसरात एका लॉज मध्ये राहून एटीएम एक्सेंज करुन जबरी चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीच्या दोनजणांना अटक करण्यात खडकी पोलिसांना यश आले आहे. नियाज इजाज मोहम्मद (वय- 29,रा. लोणी गाजियाबाद, उत्तरप्रदेश) व सावेज सलीम अली (वय- 30,रा. गाझियाबाद, उत्तरप्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. याप्रकरणी आरोपींना न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी मिळाली असून आरोपींकडून गुन्हयात चोरी झालेला माल हस्तगत करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप फुलपगारे यांनी दिली आहे.





याबाबत खडकी पोलिस ठाण्यात 9/5/2025 रोजी संजय गोपीनाथ कदम (वय- 63) यांनी तक्रार दिली होती. ते एटीएम मशीनवरुन पैसे काढत असताना, त्यांचा पिन चोरुन पाहून त्यानंतर त्यांचेकडून एटीएम मशीनवरुन पैसे काढून देतो असे सांगून एटीएमकार्डची आरोपींनी मागणी केली.

परंतु तक्रारदार यांनी आरोपींना नकार दिल्याने आरोपींनी जबरीने त्यांचे एटीएम कार्ड घेऊन जाऊन सदर एटीएमच्या माध्यमातून दुसऱ्या विविध ठिकाणावरुन एक लाख चार हजार रुपये रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. झालेला प्रकार पोलिस ठाणे हद्दीत गजबजलेल्या ठिकाणी झाल्याने स्थानिक नागरिक भयभीत झाले होते. तसेच तक्रारदार हे वयोवृध्द असून ते मासिक 12 हजार रुपये पगारावर सुरक्षारक्षक म्हणून काम करुन उदरनिर्वाह करत असल्याने त्यांची जमा झालेली आयुष्यभराची पुंजी अचानक चोरी झाली होती. याबाबत तपास पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले यांचे पथकाने गुन्हयांचे अनुषंगाने विविध टीम तयार करुन सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहिती काढणे सुरु केले. गुन्हे शोध पथकातील पोलिस अंमलदार प्रताप केदारी यांना माहिती मिळाली की, सदरचे आरोपी हे मुळचे उत्तरप्रदेश येथील रहिवासी असून ते विविध शहरात फिरत असतात. पुणे येथे नानापेठ मध्ये लॉज मध्ये राहतात.

## पुरंदर विमानतळाला शेतकऱ्यांचा मोठा विरोध आता थेट राष्ट्रपतींना पाठवणार पत्र



■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** पुरंदर तालुक्यात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाविरोधातील शेतकऱ्यांचा संघर्ष आता थेट राष्ट्रपती भवनापर्यंत पोहोचला आहे. विमानतळ रद्द करण्यासाठी आता पुरंदर तालुक्यातील बाधित गावातील शेतकरी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र पाठवणार आहेत. या पत्राच्या माध्यमातून त्यांनी केवळ विमानतळ रद्द करण्याची मागणीच नाही केली, तर भारतीय राज्यघटनेच्या मूल्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "राज्यघटना वाचवा, लोकशाही वाचवा, पुरंदर वाचवा" या टॅगलाइनसह राष्ट्रपतींना लिहिलेल्या या पत्रात एक जबाबदार घटनात्मक पालक म्हणून हस्तक्षेप करावा, अशी विनंती राष्ट्रपतींना करण्यात आली आहे. या पत्रातून राष्ट्रपतींकडे काही मागण्या देखील करण्यात आल्या आहेत.

पुरंदर येथे होणाऱ्या विमानतळाला तालुक्यातील काही गावातील शेतकऱ्यांचा कडाडून विरोध आहे. काही झाले, तरी विमानतळ होऊ देणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. विमानतळाच्या विरोधासाठी शेतकऱ्यांकडून आंदोलने देखील करण्यात आली. काही दिवसांपूर्वी झालेल्या एका आंदोलनाला हिंसक वळण लागले होते.

त्यानंतर सरकारने पुरंदर विमानतळाच्या सर्वेक्षणाची प्रक्रिया तात्पुरती थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या 10 वर्षांपासून आम्ही शांततामय आणि घटनात्मक मार्गाने पुरंदर विमानतळ प्रकल्पाचा सातत्याने विरोध करत आहोत. 5 फेब्रुवारी 2018 रोजी आम्हा शेतकऱ्यांनी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना "इच्छा मृत्यु" सारख्या तीव्र भावना व्यक्त करणारे पत्र पाठवले होते. परंतु आजपर्यंत त्याला कुठलाही उत्तर मिळालेले नाही.

## पश्चिम बंगालमध्ये भाजपचा विजय आधीच फायनल

### अमित शहाच्या दाव्यामागे ईव्हीएमचा हिशेब, निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून ईव्हीएम रवाना : संजय राऊत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या नियमांत मोठा बदल केला आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. हे सरकार शेतकऱ्यांना वापरा व वाऱ्यावर सोडून द्या अशा प्रकारे वागवत आहे. त्यामुळेच या सरकारने नुकसान भरपाईच्या नियमांत बदल केला आहे, असे ते म्हणालेत.

रोहित पवार म्हणाले की, राज्य सरकारची शेतकऱ्यांबाबतची भूमिका म्हणजे गरज सरो वैद्य मरो अशीच झाली आहे. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देताना मतांवर डोळा ठेवून निर्णय घेणारे महायुती सरकार आज सत्तेत येताच शेतकऱ्यांच्या जीवावर उठणारे निर्णय घेत आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी 1 जानेवारी 2024 रोजी राज्य शासनाने शेतकऱ्यांना अवकाळीमुळे होणारी नुकसानभरपाई देताना त्यात प्रति हेक्टरी जिराईतसाठी 8500 वरून 13600 पर्यंत वाढ केली, तर बागायतीसाठी 17000 रुपयांवरुन 27000 रुपयांपर्यंत वाढ केली होती.



त्यानंतर नोव्हेंबर 2024 मध्ये विधासभा निवडणूक सरताच आणि सत्तेवर येताच सरकारची गरजही सरली. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी 30 मे 2025 रोजी काढलेल्या शासन निर्णयात शासनाने शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीत पुन्हा 2023 सालच्या निकषाप्रमाणे कपात केली. म्हणजेच जिरायतीसाठी 13600 रुपये प्रति हेक्टरी ऐवजी आता केवळ 8500 रुपये तर बागायतीसाठी 27000 रुपये प्रति हेक्टरीऐवजी 17000 रुपये मिळणार आहेत. शिवाय मदतीची मर्यादाही 3 हेक्टरवरुन 2 हेक्टर करण्यात आली. यावरून शासन शेतकऱ्यांना केवळ वापरा आणि वाऱ्यावर सोडून द्या अशाप्रकारे वागवत असल्याचे दिसून येते.

आज रोजी राज्यात सध्या तब्बल 55 हजार हेक्टर शेतीचे नुकसान झाले. अशा परिस्थितीत या नुकसानीचे शासनाने तत्काळ पंचनामे करून 1 जानेवारी 2024 च्या शासन निर्णयानुसारच शेतकऱ्यांना मदत करुन दिलासा द्यावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे रोहित पवार यांनी नुकताच कृषि विभागात सध्या काम कमी आणि बडबडच जास्त असा प्रकार सुरू असल्याचा आरोप केला होता. कृषि विभागात सध्या काम कमी आणि केवळ बडबड जास्त असा प्रकार सुरुय. कृषि खातं ही ओसाड गावची पाटीलकी आहे, असे या खात्याचे खुद्द मंत्री माणिकराव कोकाटे हेच म्हणत असतील, तर इच्छा नसताना त्यांनी ही फुकटची पाटीलकी करु नये. सरकारनेही त्यांना मंत्रीपदावरून दूर करून माणुसकी आणि संवेदनेचे धडे आधी द्यावेत.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे

कोणताही राजकीय वारसा नसताना, स्वकर्तृत्वाने राजकारणाचे शिखर गाठणारे नेते भारतीय राजकारणात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील यात लोकनेते म्हटले जाणारे एकमेव नेते म्हणजे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब.

आज ३ जून, आज साहेबांची पुण्यतिथी. ३ जून २०१४ रोजी साहेब आपल्या लाखो अनुयायांना पोरके करून निघून गेले. १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जमलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या वडिलांचे नाव पांडुरंगराव आणि आईचे नाव लिंबाबाई मुंडे असे होते.

१९६९ सालीच गोपीनाथ मुंडे यांचे पितृछत्र हरपले. वडीलबंधु पंडितअण्णा यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते आंबेजोगाई येथे आले तिथेच त्यांच्यातील नेतृत्व समाजासमोर आले. महाविद्यालयीन निवडणुकीद्वारे त्यांचे नेतृत्व उदयास आले. याच सुमारास त्यांची ओळख भाजप नेते प्रमोद महाजनांशी झाली आणि त्यांच्यात मैत्री निर्माण झाली ही मैत्री पूढे पन्नास वर्षे टिकली.

महाजनांनी मुंडे यांच्यातील नेतृत्वगुण हेरून त्यांना अखील भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडले. पुढे या जोडीने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक आंदोलनात एकत्र भाग घेतला. दोघेही जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले.

आणीबाणीला विरोध केल्याने गोपीनाथ मुंडे यांना कारावास भोगावा लागला. १९७८ साली मुंडे साहेब जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९८० साली ते रेणापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

या दरम्यान त्यांनी भाजपला घराघरात पोहचवण्याचे काम केले. भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. ही ओळख खोडून काढण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात 'माधव' चा प्रयोग केला आणि भाजपला बहुजनांचा पक्ष बनवला. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रयत्नांमुळेच बहुजनवर्ग भाजपकडे वळला. गोपीनाथ मुंडे हे उत्कृष्ट वक्ते होते. आपल्या धारधार वक्तृत्वाने त्यांनी सभा गाजवायला सुरवात केली.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

विधिमंडळात असो की विधिमंडळाबाहेर सार्वजनिक सभेत असो मुंडे साहेब आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकत असत. विरोधी पक्षात असूनही महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली. विरोधी पक्षनेते या नात्याने ते सत्ताधाऱ्यांवर तुटून पडायचे. १९९१ ते १९९५ या काळात ते विरोधी पक्षनेते असताना सत्ताधारी काँग्रेस पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते.

१९९५ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून जनमत तयार केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच १९९५ साली राज्यात युतीचे सरकार आले. या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री बनले शिवाय गृहमंत्रीपदाची जबाबदारी देखील त्यांचावरच होती. गृहमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली.

गृहमंत्री असताना त्यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली. पोलिसांना अधिकार दिले. एन्काऊंटर हा शब्द तेंव्हाच रूढ झाला. मुंबईतून गँगवार हद्दपार करण्यासाठी त्यांनी पोलिसांना मोकळीक दिली. त्यांच्यामुळेच मुंबईतील गुन्हेगारी टोळ्या नष्ट झाल्या तर काहींनी देशाबाहेर पलायन केले. गोपीनाथ मुंडे हे कुशल प्रशासक तसेच समन्वयक देखील होते.

भाजप सेना युतीत तणाव निर्माण झाला की ते निवळण्याचे काम गोपीनाथ मुंडेच करायचे. त्यांचे आणि बाळासाहेबांचे खूप जवळचे संबंध होते. पुढे युतीची महायुती करण्याचे कामही त्यांनी केले त्यांच्यामुळेच राजू शेट्टी, रामदास आठवले, महादेव जानकर यासारखे नेते भाजपशी जुळले.

२०१४ साली महाराष्ट्रात आणि केंद्रात सत्ता आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. गोपीनाथ मुंडे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व होते. ते भाजपचे असूनही विरोधी पक्षातील नेत्यांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते.

विलासराव देशमुख आणि छगन भुजबळ यांच्याशी त्यांचे असलेले मैत्रीचे संबंध सर्वश्रुत आहे. २०१४ साली ते जेंव्हा केंद्रात कॅबिनेट मंत्री बनले तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला मात्र हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ३ जून २०१४ रोजी एका अपघातात त्यांचे निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# गडचिरोलीच्या सायकल स्नेही मंडळाबद्दल अभिमान!

**(३ जून : विश्व सायकल दिन सप्ताह विशेष)**

शारीरिक शक्तीने चालविले जाणारे दोन चाकी वाहन म्हणजे सायकल होय. अनेक ठिकाणी हे वाहतूक, व्यायाम व खेळ यांचे मुख्य व स्वस्त साधन आहे. हे साधन तीन तसेच चार चाकीही असू शकते. ती पायांनी चालविता येणारी व लोखंडी फ्रेम असणारी असते. या वाहनाने प्रदूषण अजिबात होत नाही. तिच्या उत्पादनासाठी पंजाब, हरियाणा ही राज्ये अग्रेसर आहेत. दोन वर्षांपासून गडचिरोली शहरात सायकल स्नेही मंडळ स्थापन होऊन कार्यरत आहे. ते मंडळ येथील अनेक लोककल्याणकारी कार्यात सक्रिय सहभाग घेत असते.

------------

जवळपास दोन शतकांपासून आपण सायकलीचा वाहतुकीसाठी वापर करत आहोत. सायकलीच्या वापराबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी सायकल दिन साजरा केला जातो. हल्ली थोड्या अंतराच्या प्रवासासाठीही दुचाकी आणि चारचाकींचा सर्रास वापर केला जातो. त्यामुळे प्रदूषण, तापमान वाढीचे प्रमाण वाढले आहे.

दिल्लीमध्ये तर वाढत्या प्रदूषणाला रोखण्यासाठी सम-विषमचा प्रयोग केला गेला. वाढत्या प्रदूषणाचा धोका वेळीच ओळखला नाही तर दिल्लीसारखी परिस्थिती आपल्या शहरातही उद्भवू शकते. त्यामुळे यावर उपाय करता येण्याजोगा एकच पर्याय आहे. तो म्हणजे शक्य तेवढ्या जास्त प्रमाणात प्रवासासाठी सायकलचा वापर करणे.

प्रदूषण रोखण्यासोबतच शारीरिक आरोग्यासाठीही सायकल चालविणे उत्तम व्यायाम ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने आठवड्यातून किमान एक दिवस तरी सायकल चालविण्याचा निर्धार करावा. सायकल चालविण्याचे आरोग्यदायी आणि पर्यावरणीय फायदे लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करावी. शहरात सायकल चालविण्याची संस्कृती रुजविण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संघटना आणि व्यक्तींनी पुढाकार घेतला पाहिजे.

लोकांचा सायकलकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोन बदलण्याची व सायकलिंगमुळे होणारे फायदे समजावून सांगितले पाहिजे. एवढेच करून चालणार नाही. शहरातील मार्केट, मॉल, रेल्वेस्थानक, बसस्थानक अन्य महत्त्वाच्या ठिकाणी सायकल पार्क करण्याची व्यवस्था असावी. सायकल संस्कृती रुजविताना जी वागणूक रस्त्यावरून मोटारसायकल, कार चालविणाऱ्यांना मिळते तीच सायकलिंग करणाऱ्यांना मिळाल्यास सायकल चालविण्याकडे नागरिकांचा कल वाढविण्यास मदत होईल.


पालक पाल्यांना ५० ते ६० हजार रुपयांची मोटारसायकल घेऊन देतात. पण दहा हजार रुपयांची सायकल घेऊन देत नाही. कारण ते त्यांना प्रतिष्ठेचे वाटत नाही. मोटारसायकलच्या किमतीपेक्षा महागड्या सायकल मिळतात. त्याने आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत व पैशाची बचत आणि अपघातांना पायबंद लावणे शक्य होते. परंतु ते सर्व अनभिज्ञ नव्हे तर झोपेचे सोंग घेऊन आहेत.

न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र- युनायटेड नेशन्स महासभेने ३ जून हा दिवस जागतिक सायकल दिवस- वर्ल्ड बायसीकल डे म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. याच्या उद्घाटन सोहळ्यात संयुक्त राष्ट्राचे अधिकारी, मुत्सद्दी, ॲथलेट्स, सायकलिंग समुदायाच्या अधिवक्त्यांसह मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

यावेळी सायकल चालवण्याचे महत्त्व आणि आरोग्यासाठी होणारे फायदे सांगण्यात आले होते. हा दिवस प्रथम ३ जून २०१८ रोजी अधिकृतपणे साजरा करण्यात आला होता. दैनंदिन जीवनात सायकलीचा वापर लोकप्रिय करण्याच्या उद्देशाने हा दिवस जगभरात साजरा केला जात आहे. हा दिवस सायकलचे वैशिष्ट्य आणि त्याचे अष्टपैलुत्व ओळखण्यासाठी साजरा केला जातो.

सायकल चालविणे केवळ शारीरिक आरोग्यासाठीच चांगली नाही, तर ते पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेसाठी देखील अनुकूल आहे. यावर्षी म्हणजेच २०२२ साली पाचवा जागतिक सायकल दिवस साजरा केला जात आहे. असे म्हटले जाते की, शहरवासीयांना जवळपासच्या अंतरावर जायचे असल्यास त्यांनी सायकलचा वापर करावा. यामुळे दररोज शेकडो लिटर पेट्रोलची बचत होईल. त्याचबरोबर शहरातील प्रदूषणाची पातळी देखील कमी होईल.

याशिवाय नियमित सायकलिंग केल्याने हृदयरोग, स्ट्रोक, कर्करोग आणि मधुमेह यासारख्या आजारांमुळे होणार मृत्यूचा धोका कमी होण्यास मदत होते.



दररोज ३० मिनिटे सायकल चालविणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असल्याचा डॉक्टरांचा विश्वास आहे. दररोज ३० मिनिटे सायकल चालवल्याने रात्रीची झोप चांगली येते. जर आपणास रात्री झोप न लागण्याचा त्रास असेल, तर नियमित सायकल चालविल्याने आपल्या या समस्येचे निराकरण होऊ शकते.

एका संशोधनानुसार एखादा व्यक्ती दररोज ३० मिनिटे सायकल चालवत असल्यास त्याचे मेंदू सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक सक्रिय राहते. तसेच ब्रेन पॉवर १५ ते २० टक्क्यांनी वाढण्याची शक्यताही असते. सायकलिंग केल्याने रोगप्रतिकारक यंत्रणेला योग्यरित्या कार्य करण्यास मदत होते.

एका अहवालानुसार दररोज अर्धा तास सायकल चालविल्याने इम्यून सेल्स सक्रिय होतात आणि कोणताही आजार होण्याचा धोका कमी करतात. सायकलिंग शरीरातील अतिरिक्त कॅलरी बर्न करण्यास मदत करते. नियमित सायकलिंग करून शरीरातील अतिरिक्त कॅलरी सहज बर्न करता येते. शारीरिक शक्तीने चालविले जाणारे दोन चाकी वाहन म्हणजे सायकल होय.

अनेक ठिकाणी हे वाहतूक, व्यायाम व खेळ यांचे मुख्य व स्वस्त साधन आहे. हे साधन तीन तसेच चार चाकीही असू शकते. ती पायांनी चालविता येणारी व लोखंडी फ्रेम असणारी असते. या वाहनाने प्रदूषण अजिबात होत नाही. तिच्या उत्पादनासाठी पंजाब, हरियाणा ही राज्ये अग्रेसर आहेत. दोन वर्षांपासून गडचिरोली शहरात सायकल स्नेही मंडळ स्थापन होऊन कार्यरत आहे. ते मंडळ येथील अनेक लोककल्याणकारी कार्यात सक्रिय सहभाग घेत असते.

जगातील काही देशांमध्ये सायकल चालविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये नेदरलँड देशाचा उल्लेख अवश्य करावा. नेदरलँडमध्ये तेथील लोक वाहतुकीचे साधन म्हणून ४० टक्के सायकलचा वापर करतात. यासाठी ठिकठिकाणी पार्किंग व्यवस्था, वाहतुकीचे नियम, सहज उपलब्धता या सर्व गोष्टींमुळे तिथे सायकल संस्कृती चांगली रुजली आहे.

परदेशात कुठल्याही पायाभूत सुविधा उभारताना सायकलस्वारांची सोय लक्षात घेतली जाते. पायाभूत सुविधा उभारताना सर्वप्रथम पादचारी, सायकलस्वार, सार्वजनिक वाहतूक आणि त्यानंतर खासगी वाहने अशा पद्धतीने रस्त्यांची आणि पार्किंगची आखणी केली जाते.

नेदरलॅण्डमध्ये सन २०१४ मध्ये एक अनोखा प्रयोग करण्यात आला. तिथे किलोमीटरभर लांब रात्री चमकणाऱ्या सायकल ट्रॅकची निर्मिती करण्यात आली आहे. फ्लोरोसंट रंगाचे विशिष्ट तुकडे सिमेंट-काँक्रीटमध्ये वापरण्यात आले असून दिवसाच्या प्रकाशात ते ऊर्जा साठवून घेतात व रात्रीच्या अंधारात हाच रस्ता उजळून निघतो.

स्पेनमधील सॅन सबॅस्टियन या शहरात सन २००९ साली जुन्या रेल्वेच्या बोगद्याचे रूपांतर सायकल ट्रॅकमध्ये करण्यात आले. हा जगातील सर्वात लांब सायकल बोगदा आहे. विशेष म्हणजे सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरेसुद्धा बसवण्यात आले आहेत.

भारतातही सायकलचा वापर फार पूर्वीपासून होत आहे. सायकल हेच दळणवळणाचे प्रमुख साधन होते. मात्र देशात सायकलसाठी म्हणून काही विशेष पायाभूत सुविधा उभारल्या गेल्याचे फारसे दस्तावेज उपलब्ध नाहीत. सायकलिंगबद्दलचे प्रेम वाढत आहे याबाबत शंका नाही. परंतु सायकलसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचा आपल्याकडे अभावच आहे, असे खेदाने म्हणावे लागेल! !! समस्त भावाबहिणींना विश्व सायकल दिन सप्ताहाच्या हार्दिक शुभेच्छा !!



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

# भाजपाचे ऑपरेशन बंगाल!

**पंतप्रधान नरेंद्र मोदीं पाठोपाठ, गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालचा दौरा करून २०२६ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजवले आहे.पश्चिम बंगाल मधील भाजपा नेत्यांनी त्याला ऑपरेशन बंगाल असे नाव दिले आहे.**

----------------

गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पश्चिम बंगाल दौऱ्यात ज्याप्रकारे आक्रमक भाषण केले आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना टार्गेट केले, ते पाहता, या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत, भाजपा, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला हरविण्यासाठी आपली संपूर्ण ताकद पणाला लावणार हे निश्चित आहे.

पश्चिम बंगाल मधील मुर्शिदाबाद येथील दंगलीत तेथील हिंदुंना ज्या प्रकारे टार्गेट करण्यात आले,ते लक्षात घेता, भाजपाच्या निवडणुक प्रचारात, मुर्शिदाबाद दंगलीच्या मुद्यावर जोर देण्यात येईल, या बाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.



**अभय गोखले**

अपेक्षेप्रमाणे अमित शहा यांनी आपल्या भाषणात, मुर्शिदाबाद येथील दंगलीचा उल्लेख करून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर सडकून टीका केली.शहा यांनी आरोप केला की, बांगलादेश मधून भारतात होणाऱ्या घुसखोरीला ममता बॅनर्जी या प्रोत्साहन देत असून,त्यांनी या घुसखोरांना आपली व्होट बँक बनवली आहे.

बांगलादेश मधून होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी केंद्र सरकारने सीमेवर कुंपण घालण्यासाठी ममता बॅनर्जी यांच्याकडे जमीन मागितली असता त्यांनी ती दिली नाही,असा गंभीर आरोप शहा यांनी ममतांवर केला.

वक्फ कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगाल मधील मुर्शिदाबाद येथे जे आंदोलन करण्यात आले,त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आणि खासगी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले.

या दंगलीत तृणमूल काँग्रेसच्या काही नेत्यांचा सहभाग होता,असा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे. दंगलीमध्ये एका हिंदू कुटुंबातील दोघांची हत्या करण्यात आली. यावेळी पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली, असा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे.

हल्लेखोरांनी इतकी दहशत निर्माण केली की बऱ्याच हिंदुंना आपले घरदार सोडून, दुसरीकडे आश्रय घ्यावा लागला. पोलीस निष्क्रिय झाल्याने दंगल आटोक्यात आणण्यासाठी केंद्र सरकार कडून सीमा सुरक्षा दल तैनात करण्याबाबत पश्चिम बंगाल सरकारकडे विचारणा करण्यात आली, परंतु पश्चिम बंगाल सरकारने त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला नाही.

अखेर हिंदुंचे संरक्षण करण्यासाठी काही भाजपा नेत्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली.नंतर न्यायालयाने आदेश दिल्यामुळे, पश्चिम बंगाल सरकारने सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना मुर्शिदाबाद येथे तैनात करण्यास परवानगी दिली.

सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना तेथे तैनात केल्यानंतर, त्यांनी लगेचच दंगल आटोक्यात आणली.

मुर्शिदाबाद येथील दंगलीत बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग होता ही गोष्ट पुरेशी सिध्द झाली आहे.या घुसखोरांना ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची फूस असल्याने ते असे धाडस करू शकतात. या घुसखोरांची व्होट बँक ममता बॅनर्जी यांच्या मदतीला असल्यानेच २०११ पासून आजतागायत त्या पश्चिम बंगाल मधील विधानसभेच्या निवडणुका मोठ्या मताधिक्याने जिंकत आहेत.

पश्चिम बंगाल मध्ये मुस्लिम मतदारांची संख्या साधारणपणे ३० टक्क्यांच्या आसपास आहे.बांगला देशातून सतत होणाऱ्या घुसखोरीमुळे मुस्लिम मतदारांची संख्या कमालीची वाढली आहे. १९७७ ते २०११ पर्यंत प्रदीर्घ काळ पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची वाताहत झाल्यानंतर, मुस्लिम समाजाने आपली सर्व ताकद ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी लावली आहे.काँग्रेसची ताकद एक-दोन जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे.

पश्चिम बंगाल मध्ये भाजपाला सत्तेपासून दूर ठेवायचे असेल तर ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला मत देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही ही गोष्ट तेथील मुस्लिम समाजाने बरोबर ओळखली आहे. त्यामुळेच तेथील मुस्लिम समाज ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला एक गठ्ठा मतदान करतो.

भाजपाने आजवर ममतांना पराभूत करण्यासाठी भरपूर जोर लावला परंतु जोपर्यंत राज्यातील मुस्लिम समाज ममतांच्या पाठीमागे ठामपणे उभा आहे तो पर्यंत ममतांना पराभूत करणे अतिशय अवघड आहे, याची जाणीव भाजपाला असणारच.

ममता बॅनर्जी या खूप हुशार आहेत. आपली मुस्लिम व्होट बँक सांभाळण्यासाठी त्या कोणत्याही थराला जातील. त्यामुळे मुर्शिदाबाद येथील दंगल आटोक्यात आणण्याच्या बाबतीत ममता बॅनर्जी यांनी बोटचेपी भूमिका घेतली असेल तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. ममतांना पराभूत करावयाचे असेल तर भाजपाला आपले डावपेच बदलावे लागतील.



## ऋतू पावसाळा

आला आहे जून
पाऊस घेऊन
धरणीला जाई
लावण्य देऊन

पावसाळा येता
निसर्गाला बळ
नका करू कोणी
निसगार्चा छळ

रिमझिम सरी
पडतील दारी
टप टप थेंब
करतील वारी

धरणीच्या भेटी
पावसाच्या धारा
आगमना आधी
सोसाट्याचा वारा

ऊन वाऱ्या संगे
पावसाचा खेळ
आकाशात रंगे
इंद्रधनु मेळ

पाऊस धारांनी
भिजली ही धरा
काठोकाठ भरी
ओंजळीच्या करा

धरणीला लागे
पावसाची आस
पावसाळा ऋतू
ऋतुमध्ये खास

**प्रा. सौ. वर्षा विलास कावरे**
**बालाजी नगर,**
**मूर्तिजापूर, अकोला.**
**9021673178**

## वाचक लिहितात

### पर्यावरणप्रेमाचे धडे फक्त एका समाजालाच?

देशासह राज्यात उद्योगधंद्यांना जशी चालना मिळत गेली तशी प्रदूषणामध्येही वाढ होत गेली. कारखान्यांमधील दूषित आणि रासायनिक द्रव नद्यांमध्ये वर्षभर सोडल्याने होणाऱ्या जलप्रदूषणाच्या तुलनेत गणेशमूर्ती विसर्जनाने होणारे प्रदूषण नगण्य असतानाही तथाकथीत पर्यावरणप्रेमी आणि स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी नैसर्गिक प्रवाहांत गणेशमूर्ती विसर्जनाला विरोध करतात.

हिंदू समाजाने पर्यावरणाला नेहमीच आदरस्थानी मानल्याने घरी मातीची गणेशमूर्ती बसवणाऱ्यांचे प्रमाण आज कमालीचे वाढले आहे. दिवाळी जवळ आली की पर्यावरणप्रेमी फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. हिंदूंनी याचेही स्वागत करून गेल्या काही वर्षांत मोठ्या आवाजापेक्षा शोभेच्या फटाक्यांना अधिक पसंती दिली आहे. होळीला केवळ सुकी लाकडे जाळली जातात तर रंगपंचमीच्या दिवशीही पाण्याचा कमीतकमी वापर करून सुक्या रंगाने होळी साजरी करण्याचा प्रयत्न करतात. एकूणच पर्यावरणप्रेमींच्या प्रत्येक सूचनांचे हिंदूंनी स्वागतच केले आहे.

मात्र हेच पर्यावरणप्रेमी बकरी ईदच्या दिवशी लाखो जनावरांची कत्तल केली जाते, सांडलेले रक्त धुऊन काढण्यासाठी कोट्यवधी लिटर पाणी वापरले जाते तेव्हा कुठे असतात? पर्यावरणप्रेमाचे धडे यांना का दिले जात नाहीत? आजमितीला राज्यातील कितीतरी गावे दुष्काळाचा सामना करत आहेत. वरुणराजाचे आगमन यंदा लवकर झाले असले तरी राज्यातील दुष्काळ संपवेल का याचा काहीच नेम नाही. पाणी वाचवण्याचे, पाणी साठवण्याचे धडे प्रशासनाकडून वर्षभर दिले जातात मग बकरी ईदनिमित्त होणाऱ्या पाण्याच्या अपव्ययाकडे का दुर्लक्ष केले जाते? पर्यावरण रक्षणासाठी झटणारी मंडळी मुस्लिम बांधवांना इको फ्रेंडली बकरी ईद साजरी करण्याचे आवाहन केव्हा करणार?

■ **सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

### गोव्याच्या आध्यात्मिक पर्यटनाला चालना

आज पर्यंत गोवा म्हटलं की पर्यटन, मौजमजा एवढेच आपल्याला माहित होते. देश- विदेशातील लोकांसाठी गोवा हे पर्यटनाचे मुख्य केंद्र राहिले आहे. परंतु मागच्या महिन्यात गोव्यात सनातन -राष्ट्रशंखनाद महोत्सव पार पडला, तेव्हापासून गोवा म्हणजे 'निव्वळ पर्यटन' ही ओळख या महोत्सवाच्या निमित्ताने यापुढे धूसर होणार हे निश्चित. गोवा ही ऋषीमुनींची तपोभूमी. भगवान परशुरामांची कर्म भूमी. तप,साधना ही त्या भूमीची खरी ओळख. सनातन शंखनाद, हा साधना, शौर्य आणि देशभक्ती या त्रीसूत्रीवर उभा राहिलेला महोत्सव होता. हा शंखनाद म्हणजे हिंदूंचा आत्मविश्वास आणि दिशा यांचा रणघोष ठरला.

या पवित्र परशुराम भूमीत झालेला हा शंखनाद, सनातन संस्कृतीच्या विजय पथाचा शुभारंभ ठरेल हे निश्चित. या महोत्सवामुळे येथील अर्थकारण आणि सांस्कृतिक पर्यटन वाढेल. महोत्सवासाठी आलेल्या राष्ट्रप्रेमींनी यानिमित्ताने गोव्यातील मंदिरे ,ऐतिहासिक स्थळे यांना भेटी दिल्याने, गोव्यातील अध्यात्मिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. देश-विदेशातून आलेल्या मान्यवरांना गोवा ही 'भोगभूमी' नसून ती 'योगभूमी' आहे हे ठसविण्यात या महोत्सवामुळे मोठे यश मिळाले.

■ **कु. राधा पिंपळापुरे, उमरेड.**




मीठ हा आपल्या आहारातील एक आवश्यक घटक आहे. मीठ तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात. मीठाशिवाय, बहुतेक अन्नपदार्थ बेचव होतील. मीठ केवळ चवीसाठीच महत्त्वाचे नाही तर ते आपल्या शरीरासाठी देखील आवश्यक आहे. बरेच लोक जास्त मीठ खातात, तर बरेच लोक कमी मीठ खातात.

शरीराच्या कार्यासाठी मीठ आवश्यक आहे. त्यात सोडियम असते, जे स्नायूंचे कार्य, मज्जातंतूंचे सिग्नलिंग आणि द्रवपदार्थांचे संतुलन राखण्यास मदत करते. महिनाभर मीठ सेवन केले नाही तर शरीरावर काय परिणाम होईल याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्यांसाठी, काही दिवसांसाठी मीठाचे सेवन कमी करणे किंवा मीठ वापरणे बंद करणे फायदेशीर ठरू शकते. जास्त मीठ खाल्ल्याने शरीरात सोडियमचे प्रमाण वाढते, ज्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि रक्तदाब वाढतो. अशा स्थितीत जेव्हा मिठाचे प्रमाण कमी होते तेव्हा रक्तदाब सामान्य होतो आणि हृदयालाही कमी काम करावे लागते. यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

जास्त मीठ खाल्ल्याने शरीरात पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. यामुळे हात-पाय सुजू लागतात आणि वजनही वाढू शकते. मीठ न खाल्ल्याने ही समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होते. शरीर जास्तीचे पाणी बाहेर काढते आणि सूज कमी होते.

तथापि, महिनाभर मीठ न खाल्ल्याने गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. जर महिनाभर मीठ सेवन केले नाही तर शरीरात सोडियमची कमतरता निर्माण होऊ शकते आणि शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडू शकते. यामुळे स्नायू पेटके, अशक्तपणा, चक्कर येणे आणि थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. विशेषतः उन्हाळ्यात, घामाद्वारे मीठ बाहेर पडते आणि मीठ न खाल्ल्याने शरीरात मीठाची गंभीर कमतरता निर्माण होऊ शकते. जर मीठ खाणे पूर्णपणे बंद केले तर शरीरातील आयोडीनची पातळी कमी होऊ शकते, ज्यामुळे थायरॉईडची समस्या उद्भवू शकते. आयोडीनच्या कमतरतेमुळे मानेला सूज येते, हार्मोनल असंतुलन होते आणि चयापचय मंदावतो.

मीठ न खाणे जितके हानिकारक असू शकते तितकेच जास्त मीठ खाणे देखील तितकेच हानिकारक आहे. म्हणून संतुलन राखणे महत्वाचे आहे.

जर एखाद्या व्यक्तीला उच्च रक्तदाब किंवा हृदयरोग असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मर्यादित प्रमाणात मीठ घेणे चांगले. एका निरोगी व्यक्तीला दिवसाला सुमारे ५ ग्रॅम म्हणजे सुमारे १ चमचा मीठ आवश्यक असते. शरीराच्या योग्य कार्यासाठी, मीठ मर्यादित प्रमाणात खा आणि जास्त काळ ते वगळू नका.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### आमदनी अठन्नी?

आमदानी अठन्नी अन
खर्च कराल रूपया तर
कर्ज होणारच ना भैया?

कुटूंब असो की देश
सर्वांना अर्थशास्त्राचा
हा बहुमोल संदेश ...

उत्पादक खर्चातून असते
समृद्धीची आशा
फुकट सवलती
करती निराशा ...

# नैसर्गिकरित्या रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी दैनंदिन आहारामध्ये समाविष्ट केले पाहिजेत असे खाद्यपदार्थ

**नागपूर, २ जून :** देशभरात कोविड आणि फ्लूच्या वाढत्या केसेससह रोगप्रतिकारशक्ती प्रबळ व आरोग्यदायी ठेवणे महत्त्वाचे आहे. संसर्गांमधील या हंगामी वाढीमुळे सतत खोकला, सर्दी, पचनसंबंधित समस्या आणि रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होणे अशा आरोग्यसंबंधित समस्यांचा धोका आहे. एमबीबीएस व न्यूट्रिशनिस्ट डॉ. रोहिणी पाटील सल्ला देतात की दैनंदिन आहारामध्ये बदाम, हळद व आले यांसारख्या पौष्टिक सुपरफूड्सचा समावेश केल्यास या असुरक्षित काळादरम्यान रोगप्रतिकाशक्ती वाढवण्यास आणि आरोग्य उत्तम ठेवण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते.



चला तर मग, या रोगप्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या सुपरफूड्सबाबत अधिक माहिती जाणून घेऊया. डॉ. रोहिणी संसर्गांच्या या लाटेदरम्यान शारीरिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी नियमित आहारामध्ये या सुपरफूड्सचा समावेश करण्याची शिफारस करतात.

कॅलिफोर्निया बदाम: ड्राय फ्रूट्सचा राजा म्हणून प्रख्यात असलेल्या कॅलिफोर्निया बदामांमध्ये १५ आवश्यक पौष्टिक घटकांसह आरोग्यदायी फॅट्स, प्रथिने, झिंक, मॅग्नेशियम, अँण्टीऑक्सिडण्ट्स आणि व्हिटॅमिन ई असते. हे पौष्टिक घटक हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवतात आणि ऊर्जा पातळ्या वाढवण्यास मदत करतात. फूड सेफ्टी अँड स्टॅण्डर्ड्स ऑथोरिटी ऑफ इंडिया (एफएसएसएआय) (भारतीय खाद्य सुरक्षा व मानक प्राधिकरण)ने शिफारस केल्याप्रमाणे, दैनंदिन आहारामध्ये बदामांचा समावेश केल्याने रोगप्रतिकारशक्ती प्रबळ होण्यास मदत होऊ शकते, ज्यामुळे एकूण आरोग्य उत्तम राहते. तसेच नियमितपणे कॅलिफोर्निया बदामांचे सेवन केल्याने त्वचा आरोग्यदायी राहू शकते आणि बदामांमधील नैसर्गिक भूकेचे शमन करण्याच्या गुणधर्मांमुळे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते.

डॉ. पाटील फ्लूच्या हंगामादरम्यान आहारामध्ये बदामांसारख्या या सुपरफूड्सचा समावेश करण्याची शिफारस करतात, ज्यामुळे हंगामी आरोग्यसंबंधित आजारांना प्रतिबंध करण्यास आणि एकूण आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत होते.

## जेव्हा तुम्हाला तुमच्यासाठी द वन सापडेल तेव्हा प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द वेडिंग एडिशन' ने उत्सव साजरा करा

**मुंबई, २ जून :** २०२५ च्या उन्हाळी लग्नसराईला लक्षात घेऊन प्लॅटिनम लव्ह बँड्ने 'द वेडिंग एडिशन' या खास जोडप्यांसाठीच्या बँड्सच्या संग्रहाची घोषणा केली आहे. ९५% शुद्ध प्लॅटिनमपासून तयार करण्यात आलेले हे बँड्स, प्रेम आणि बांधिलकीचं प्रतीक ठरतात. या नव्या शृंखलेत प्रेमाच्या विविध पैलूंना अधोरेखित करणाऱ्या खास डिझाइन्सचा समावेश आहे. हे बँड्स केवळ सौंदर्यपूर्ण नसून, दोन व्यक्तींच्या भावनिक नात्याची खोली दाखवतात, असा दावा कंपनीने केला आहे. ९५% शुद्ध प्लॅटिनममध्ये तयार केलेले प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द लाखात एक' प्रेमाच्या भावनेचे दुर्मिळ आणि कालातीत प्रतिध्वनी आहेत. ताऱ्याखाली किंवा लग्नाच्या गोंधळात शांत क्षणी देवाणघेवाण असो, हे बँड अशा जोडप्यांसाठी बनवले जातात जे नात्याचा सखोल अर्थ शोधतात - परस्पर आदर, वैयक्तिकता आणि खरोखरच दुर्मिळ असलेल्या प्रेमावर बांधलेल्या भागीदारीचे प्रतीक. तुम्ही एखाद्या भव्य उत्सवाची योजना आखत असाल किंवा एखाद्या छोट्याशा प्रसंगाची योजना आखत असाल, तर प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द वेडिंग एडिशन' हे तुमच्या प्रवासाला एका दुर्मिळ मौल्यवान धातूने सजवण्यासाठी आमंत्रण आहे जे खरोखरच अद्वितीय आहे.

देशभरातील आघाडीच्या ज्वेलर्समध्ये प्लॅटिनम लव्ह बँड्स - द वेडिंग एडिशन एक्सप्लोर करा. प्लॅटिनम सीझन ऑफ लव्ह आता दुकानांमध्ये उपलब्ध आहे, तुमच्या कथेसारख्या दुर्मिळ धातूने तुमचे वचन पूर्ण करण्याची हीच योग्य वेळ आहे. आणि ६०,००० प्रति जोडी पासून सुरू होणाऱ्या किमतींसह, सर्वात मौल्यवान वस्तू तुमच्या विचारापेक्षा जवळची असू शकते.

# सूर्यापासून मातीपर्यंत: सौरऊर्जेवर शेती करण्यासाठी, एमएसकेव्हीवाय २.0 ची अवादा ची वचनबद्धता

**यवतमाळ, २ जून :** अवादा ग्रुप सध्या महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या (एमएसकेव्हीवाय) अंमलबजावणीत सक्रिय आहे. ही योजना कृषी क्षेत्रात सौर ऊर्जेद्वारे आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा उद्देश बाळगते. या पुढाकाराच्या माध्यमातून अवादा राज्यातील कृषी क्षेत्रासाठी शाश्वत ऊर्जा हस्तांतरण सक्षम करत आहे आणि ग्रामीण महाराष्ट्रातील जीवनमानात विकेंद्रीत (डीसेंट्रलाइज्ड) सौर ऊर्जेद्वारे सकारात्मक बदल घडवत आहे.

ही योजना प्रथम २०१७ मध्ये सुरू झाली होती, ज्यामध्ये कृषिप्रधान उपकेंद्राजवळ सौर प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना दिवसाकाठी विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, असा उद्देश होता. योजनेच्या प्रभावी परिणामांची दखल घेत, महाराष्ट्र शासनाने एमएसकेव्हीवाय २.0 (मिशन २०२५) अंतर्गत या योजनेचा विस्तार केला आहे. या टप्प्यात, २०२५ पर्यंत राज्यातील ३0% कृषी फीडर सौर ऊर्जा आधारित करण्यासाठी ७,000 मेगावॅट सौर क्षमतेच्या अंमलबजावणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

हे विकेंद्रीत प्रकल्प 0.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचे असून, कृषिप्रधान भागांतील वितरण उपकेंद्राच्या ५१0 किमी अंतरावर उभारले जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा सातत्याने वीज मिळत असून, शेतीचे उत्पादन व कार्यक्षमतेत मोठी सुधारणा होत आहे.

या पुढाकाराचा एक प्रमुख भागीदार म्हणून अवादा ग्रुप सध्या नाशिक, पुणे, सांगली, यवतमाळ, अहमदनगर, बीड, अमरावती, हिंगोली, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये एकूण १,१३२ मेगावॅट (एसी) क्षमतेचे सौर प्रकल्प राबवत आहे. हे प्रकल्प ग्रामीण भागातील ऊर्जा परिस्थिती बदलत असून, महागड्या डिझेलवरील अवलंबन कमी करत आहेत आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देत आहेत.

एमएसकेव्हीवाय २.0 अंतर्गत अवादा सुमारे ८७५ मेगावॅट क्षमतेचे सौर पॅनेल महाराष्ट्रातच तयार करणार आहे, ज्यामुळे मेक इन महाराष्ट्र मोहिमेला चालना मिळणार असून स्थानिक उद्योग क्षेत्रही मजबूत होणार आहे.

अवादा एमएसकेव्हीवाय अंतर्गत स्वच्छ ऊर्जेच्या प्रसाराचा एक सशक्त उदाहरण घालून देत आहे. सौर ऊर्जा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून, केवळ शेती क्षेत्राचा कार्बन फूटप्रिंट कमी करत नाही, तर ग्रामीण भागात हवामान स्थित्यंतराशी जुळवून घेण्याची क्षमता देखील तयार करत आहे.

ही योजना अशा काळात राबवली जात आहे जेव्हा भारताने २०३० पर्यंत ५०० गीगावॅट नॉन-फॉसिल इंधनावर आधारित ऊर्जा क्षमता साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या राष्ट्रीय मोहिमेला अवादा कडून कृषी सौर क्षेत्रात मिळणारा हातभार केवळ महत्त्वाचा नाही, तर समावेशक आणि शाश्वत ऊर्जा भविष्याचे प्रतीकही आहे.

# क्रिस्ट्रल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड आणत आहे जिवोरा कापसाच्या पिकासाठी नेक्स्ट जनरेशन कीटकनाशक

**मुंबई, २ जून :** आपला कीटकनाशक पोर्टफोलिओ विस्तारण्यावर लक्ष केंद्रित करून क्रिस्ट्रल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड (सीसीपीएल) या भारतातील आघाडीच्या कृषी-रासायनिक उत्पादन कंपनीने सखोल संशोधन करून विकसित केलेला कीटकनाशकाचा नवीन प्रकार बाजारात आणत असल्याची घोषणा आज केली.

भारतातील पीक-संरक्षण बाजारपेठ २०२५ मधील २.५९ अब्ज डॉलर्सवरून ४.३५ टक्के सीएजीआरने वाढून २०३० सालापर्यंत ३.२१ अब्ज डॉलर्सपर्यंत जाणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असतानाच कंपनीने या उत्पादनाची घोषणा केली आहे.

ही वाढ आणखी पुढे नेण्यासाठी आणि या विभागातील बाजारपेठेतील आघाडीची कंपनी हे स्थान आणखी भक्कम करण्यासाठी सीसीपीएलने आज जिवोरा हे अत्याधुनिक कीटकनाशक बाजारात आणत असल्याची घोषणा केली. कापसाच्या उत्पादनातील रसशोषक किडीच्या वाढत्या आव्हानावर मात करण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे.

जिवोरा ५ लाख एकरांतील कापसाच्या पिकापर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे, त्याचप्रमाणे प्रमुख बाजारपेठांतील ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांशी याद्वारे थेट जोडून घेतले जाणार आहे.

जिवोरा बाजारात आणल्यामुळे क्रिस्ट्रल क्रॉप प्रोटेक्शन कंपनीच्या कीटकनाशक पोर्टफोलिओमध्ये ७ टक्क्यांनी वाढ होणे अपेक्षित आहे.

सुरुवातीला क्रिस्ट्रलतर्फे आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान, हरयाणा या राज्यांमधील प्रमुख बाजारपेठांमध्ये जिवोरा उपलब्ध करून दिले जाणार आहे.

क्रिस्ट्रलचा अत्याधुनिक संशोधन व विकास आणि शेतकरीकेंद्री दृष्टिकोन यांमुळे बाजारपेठेचे सखोल संशोधन करून तसेच भारतातील कापूस उत्पादक प्रदेशांमधील शेतांमध्ये चाचण्या घेऊन जिवोरा हे उत्पादन तयार करण्यात आले आहे. नवोन्मेष्कारी स्वरूपाचे मिश्रण आणि गुणवत्ता सिद्ध केलेली परिणामकारकता यांमुळे जिवोरा हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सज्ज आहे.

जिवोरा हे केवळ कीटकनाशक नाही- कापूस शेतकऱ्यांना अधिक निरोगी पीक आणि सुधारित नफाक्षमता मिळवून देण्याची ही ग्वाही आहे. या उत्पादनाची दुहेरी काम करणारी यंत्रणा आणि फिटो-टॉनिक (अतिरिक्त लाभ मिळवून देणारा) प्रभाव यांच्यामुळे जिवोरा कीटक नष्ट करण्यासोबतच पिकाच्या आरोग्याचीही काळजी घेते, असे क्रिस्ट्रल क्रॉप प्रोटेक्शनचे व्यवस्थापकीय संचालक अंकूर अगरवाल म्हणाले.

क्रिस्ट्रलच्या अधिकृत वितरण नेटवर्कमध्ये जिवोरा ५0 ग्रॅम, १00 ग्रॅम, २५0 ग्रॅम, ५00 ग्रॅम आणि १ किलो वजनाच्या पॅकिंगमध्ये उपलब्ध आहे. जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच योग्य वापराबाबत सूचना देण्यासाठी क्रिस्ट्रल लवकरच सर्व प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये क्षेत्र अभियाने, प्रात्यक्षिके, शेतकरी सल्ला कार्यक्रम सुरू करणार आहे.

कापूस हे भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे पीक आहे आणि पिकाला कीड लागण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये गुणकारी ठरणारा विश्वासार्ह उपाय शेतकऱ्यांना पुरवण्याचा प्रयत्न म्हणून आम्ही जिवोरा विकसित केले आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला जास्तीत-जास्त संरक्षण मिळावे आणि त्यांना कमाल नफा मिळावा याची निश्चिती करण्यात मदत करणे हे आमच्यापुढील लक्ष्य आहे, असे क्रिस्ट्रल क्रॉप प्रोटेक्शनच्या विक्री व मार्केटिंग विभागाचे उपाध्यक्ष सोहित सत्यावली यांनी सांगितले.

आज भारतातील शेतकऱ्यांमध्ये पिकांचे संरक्षण करणारी उत्पादने वापरण्याचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला लाभदायी ठरू शकेल, अशी विस्तृत संभाव्यता खुली करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# एचडीएफसी बँकेचा महाराष्ट्रात भव्य ऑटो लोन मेळा

**नागपूर, २ जून :** भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक असलेल्या एचडीएफसी बँकेकडून महाराष्ट्रात दोन दिवसांचा भव्य ऑटो लोन मेळा आयोजित केला जात आहे. हा मेळा ३ आणि ४ जून २०२५ रोजी (मुंबई वगळता) महाराष्ट्रातील ३२५ शाखांमध्ये पार पडणार आहे.

या मेळ्यात भाग घेणाऱ्या प्रमुख चारचाकी वाहन डिलरशिप्स त्यांच्या नव्या गाड्या सादर करतील. मेळा येणाऱ्या ग्राहकांना गाड्या प्रत्यक्ष पाहता व टेस्ट ड्राईव्ह करता येतील. पात्र ग्राहकांना त्वरित कर्ज मंजुरी व सोप्या हप्त्यांमध्ये परतफेडीच्या सुविधा मिळतील.

हा ऑटो लोन मेळा ग्राहकांना अधिकृत आणि विश्वासार्ह गाडी विक्रेत्यांशी जोडण्यासाठी एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देतो, तसेच एचडीएफसी बँकेच्या एक्सप्रेस कार लोनच्या माध्यमातून त्वरित कर्ज वितरण सुनिश्चित करतो. ही सुविधा विद्यमान तसेच संभाव्य एचडीएफसी बँक ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

एक्सप्रेस कार लोन प्लॅटफॉर्म संपूर्ण डिजिटल, कागदपत्रविरहित आणि कॉन्टॅक्ट-फ्री प्रक्रिया सक्षम करतो, ज्याद्वारे वाहन कर्ज फक्त ३0 मिनिटांत डिलरला वितरित केले जाते. एचडीएफसी बँकेच्या एक्सप्रेस कार लोनद्वारे ग्राहकांना कोणतेही कागदपत्र न देता आणि १००% डिजिटल प्रक्रियेद्वारे फक्त ३0 मिनिटांत गाडी खरेदी करता येते.

ऑटो लोन मेळा हे संभाव्य खरेदीदार आणि डिलर्स यांना एकाच छताखाली आणून, गाडी खरेदीचा सोपा आणि सुलभ अनुभव देण्यासाठी आहे. पात्र ग्राहकांना आकर्षक ऑफर्स आणि तात्काळ कर्ज मंजुरी मिळेल. ग्राहक-केंद्रितता आणि सोयीचा अनुभव देण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे एचडीएफसी बँकेचे महाराष्ट्रातील ब्रँच बँकिंग प्रमुख तरुण चौधरी यांनी सांगितले.

# हॅपीडेंट चमकिंग गम: चमकली मुस्कान, झगमगलं जग आपल्या खास कथाकथनाला नवा सिनेमॅटिक ट्विस्ट देत प्रस्तुत

**नागपूर, २ जून :** परफेटी व्हॅन मेल इंडियाचा प्रसिद्ध च्युइंग गम ब्रँड हॅपीडेंटने एक नवीन जाहिरात फिल्म सादर केली आहे. ही जाहिरात मजेशीर असली तरी त्यामागे एक खास अर्थ आहे. चमकिंग गम : चमकली मुस्कान, झगमगलं जग या मोहिमेद्वारे हॅपीडेंटने त्यांच्या जुन्या प्रसिद्ध गोष्टी सांगण्याच्या पद्धतीला एक नवा, सिनेमा सारखा ताजा अंदाज दिला आहे.या मोहिमेतून हास्याचं सौंदर्य आणि त्यातून मिळणाऱ्या आनंदाची जादू दाखवली आहे. ही जाहिरात लोकांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारी असून सुंदर दृश्यांसह सादर केली आहे.




मॅक्केन वर्ल्डग्रुप इंडियाने ही मोहीम तयार केली आहे. प्रसिद्ध कलाकार प्रसून जोशी यांनी या जाहिरातीसाठी गाण्याचे बोल लिहिले आणि स्वत:चा आवाजही दिला आहे. या गाण्याचे संगीत शांतनू मोइत्रा यांनी बनवले आहे. ही मोहीम नवीन पिढीला लक्षात ठेवून बनवली आहे, ज्यांना खरेपणा, खेळकरपणा आणि उद्देश महत्त्वाचा असतो. जाहिरातीत काही कलाकार आहेत जे लाल रंग आणि चमकत्या हास्याच्या मदतीने लोकांना परिसरात फालतू कचरा टाकणे चुकीचे आहे हे दाखवतात. ही जाहिरात सांगते की छोटे -छोटे चांगले काम समाजात मोठा बदल घडवू शकतात.

परफेटी व्हॅन मेल इंडिया चे मार्केटिंग डायरेक्टर गुंजन खेतान यांनी पुढे सांगितले, हॅपीडेंट नेहमीच कल्पनाशील कथाकथनाच्या शक्तीत विश्वास ठेवते, अशा कथा जे फक्त मनोरंजन करत नाहीत, तर लोकांना जोडतात. ही मोहीम तेजस्वी हास्याला कल्पना, अभिव्यक्ती आणि अर्थ यांचा प्रतीक म्हणून साजरी करते. चमका मुस्कान, जगमग जहाँ ही फक्त एक टॅगलाइन नाही तर ती ब्रँडची आणि आपण ज्या काळात जगतो त्याची आत्मा आहे. जेव्हा आपण जनरेशन झेड आणि आधुनिक प्रेक्षकांशी संवाद साधतो, तेव्हा आम्हाला अशा कथा तयार करण्याचा अभिमान आहे, जे उद्देश आणि भावनिक संबंध दाखवतात आणि दृश्यात्मक तेजस्विताही आहे.

मॅक्केन वर्ल्डग्रुप इंडियाचे मुख्य क्रिएटिव्ह ऑफिसर आणि सीईओ, प्रसून जोशी म्हणाले, हॅपीडेंटसाठी लिहिणे माझ्या मनाला नेहमीच खूप जवळचे राहिले आहे. पण हा प्रकल्प परफेटी टीमच्या न थकणाऱ्या विश्वास आणि सहकार्याशिवाय शक्यच होऊ शकला नसता. विशेष आभार निखिल यांना, ज्यांनी धाडसी कल्पनांवर विश्वास ठेवला. तसेच गुंजन यांचेही, ज्यांनी आम्हाला सर्जनशील स्वातंत्र्य दिले जेणेकरून आम्ही उंच भरारी घेऊ शकलो. त्यांनी समीर सुनेजा यांसारख्या दूरदर्शी व्यक्तींच्या वारशाला जपले, ज्यांनी परफेटीच्या जाहिरातींना नवीन अर्थ दिला. ज्या दिवशी मी या प्रोजेक्टसाठी विनील यांना भेटलो, त्या दिवशी मला कळाले की हा व्यक्तीच या कल्पनेला आणि पटकथेला जीवंत करेल. त्याला सर्जनशीलता आणि कथाकथन यासाठी एक अपवादात्मक दृष्टीकोन आहे, आणि ते प्रत्येक फ्रेममध्ये दिसून येते. माझी अद्भुत टीम - उत्कट, गौरव, जीत, अभिषेक आणि माझा जुना संगीत भागीदार शांतनू यांना देखिल मन:पूर्वक धन्यवाद.

नवीन हॅपीडेंट जाहिरात केवळ एक सामान्य जाहिरात नाही, तर ती एक आठवण आहे की जेव्हा एकाधी जाहिरात धाडसाने स्वप्ने पाहते, हसते आणि भावना व्यक्त करते, तेव्हा ती काय असू शकते.

# झी सिने अॅवॉर्ड्स २०२५ ने दिली भारतीय सैन्य दलांना हृदयस्पर्शी मानवंदना

**मुंबई, २ जून :** अपारशक्ती खुराणाच्या प्रभावी वंदे मातरम् आणि पलक मुच्छलच्या भावनांनी भरलेल्या ए मेरे वतन के लोगों ने प्रेक्षकांना अभिमान आणि अश्रूंनी भारावून टाकले. आता याक्षणी भारतीय सैन्य दलांचे शौर्य संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणेचे प्रतीक असताना, मारुती सुझुकी प्रस्तुत २३ वे झी सिने अॅवॉर्ड्स २०२५ या सोहळ्याने या खऱ्या हीरोजना एक भावनिक आदरांजली अर्पण करून त्यांच्या सेवेची दखल घेतली. सिनेमातील झगमगाट, पुरस्कार आणि जल्लोषामध्ये झी ने या खास क्षणी देशप्रेम, एकता आणि कृतज्ञतेचा संदेश देत आपल्या देशासाठी नि:स्वार्थ सेवा देणाऱ्या शूरवीरांना सलाम करण्यासाठी एका सामूहिक गौरव आणि आदराचा प्रसंग उभा केला. तिरंग्याचा अभिमान आणि आदरपूर्वक शांततेच्या पार्श्वभूमीवर ही भावनिक आदरांजली सादर करण्यात आली आणि त्यामुळे उपस्थित प्रत्येकाला अशा मंचांचा खरा उद्देश आठवला आणि तो म्हणजे आपल्या आठवणींमध्ये आणि आदरभावनेत एकत्र येण्यासाठी हृदयांना जोडणे.




या संध्येला आणखी खास बनवले पलक मुच्छलच्या आवाजाने, ज्याची तुलना सूत्रसंचालक विक्रांत मास्सीने स्वर्गीय लता मंगेशकर यांच्याशी तुलना करत आमच्या पिढीचा आवाज असे संबोधले. पलकने ए मेरे वतन के लोगों हे गीत पूर्ण श्रद्धेसह आणि सुरेखपणे सादर केले. तिच्या या सादरीकरणात तिचे पती मिथून यांचीही उपस्थिती होती. लग्नानंतर प्रथमच हे दोघे अशा सार्वजनिक कार्यक्रमामध्ये एकत्र दिसून आले. पलकच्या गायनाने अनेकांची डोळे पाणावले आणि आपल्या देशाचा अभिमान उंच राखण्यासाठी आपल्या सैनिकांच्या बलिदानाची जाणीव करून दिली.

या परफॉर्मन्सबद्दल पलक मुच्छल म्हणाली, हे सादरीकरण माझ्या कारकिर्दीतील सर्वात भावनिक आणि अविस्मरणीय क्षणांपैकी एक होते. ए मेरे वतन के लोगों हे गाणे नेहमीच एक सन्मानाची भावना देते पण झी सिने पुरस्काराच्या मंचावर, प्रेक्षकांसमोर हे सादर करणे खूपच विनम्र करणारे होते. हे फक्त एक गाणे नव्हते हे आमच्या देशाचे रक्षण करणाऱ्या वीरांना दिलेले एक हृदयस्पर्शी अभिवादन होते. प्रत्येक वेळी जेव्हा मी हे गीत गाते, तेव्हा मी लता दीदींची आठवण काढते आणि त्यांनी हे गीत पहिल्यांदा गाताना त्यांच्या मनात काय भावना असतील याचा विचार करते. ते अजूनही माझ्या अंगावर रोमांच आणते. हे असे क्षण असतात जे आपल्याला आठवण करून देतात की आम्ही जे काही करतो ते का करतो हे केवळ मनोरंजनासाठी नव्हे, तर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि प्रेरणा देण्यासाठीही आहे. आणि हे सादरीकरण मिथूनसोबत शेअर करणे तर माझ्यासाठी आणखी खास होते. झी सिने अॅवॉर्ड्सचे मनापासून आभार, की त्यांनी आम्हाला आपल्या देशाचा सन्मान करण्यासाठी आणि एक सुंदर आठवण निर्माण करण्याची संधी दिली.

या भावनिक आदरांजलीव्यतिरिक्त या संध्येमध्ये एक से एक दमदार परफॉर्मन्सेस, आयकॉनिक ऑन-स्टेज रीयुनियन्स आणि वर्षातील काही सर्वात प्रभावी सिनेमांच्या प्रवासांमागील उत्कटत आणि अथक परिश्रमांचा उत्सवही साजरा करण्यात आला.

# शब्दकोडे क्रमांक २१२७



**आडवे शब्द :-**

१) युक्ती
५) पन्नास पैशाचे जुने नाणे, आमदानी *** खर्चा रुपैया
७) तलवारीला साथ देणारी
११) घोंगडी विणणारी जमात
१२) पवित्र
१४) कर्जात बुडालेला
१५) पांढुरका रंग
१६) फुलांची टोपली
१९) दिवस
२१) तारुण्य
२३) वक्र
२४) अरण्य
२६) मोठी विहीर
२७) समाजातील वचक
२८) वतन मिळालेला
२९) वर्तुळाकार
३२) दुप्पट (इं)
३४) बरणीच्या तोंडावर लावलेले फडके
३६) जुळा
३८) कठीण, अवघड
३९) जाणणे, समजणे
४१) पती
४३) ओलीच्या विरुद्ध
४४) एक रत्न
४५) गुलाम, सेवक
४७) वाळवी
५०) हळू, संथ
५२) तलाव
५४) विधवा
५७) अंधार
५९) प्रजा लोक
६१) नवा जोम, चलाखी चपलता
६२) लुबाडणारा, फसव्या
६५) वंदनाचा एक शब्द
६७) गरज
६९) आगबोट
७१) धरणारा
७३) स्वाक्षरी
७४) माया, ममत्व
७६) माळ, हार
७७) शंकर
७८) वर्षानुवर्षे
७९) शिकार

**उभे शब्द :-**

१) कौशल्य
२) कांतार
३) सुसर
४) होडी
५) पुष्कळ
६) ठकबाज, लुचा
८) ठोक दिल्याशिवाय खट्याळ माणूस सरळ होत नाही (म्हण)
९) ऐट
१०) निर्धन
१३) पातक
१५) पिवळे वस्त्र
१७) पराग
१८) दु:ख
२०) अंत:करण
२२) संसार, जन्म
२३) इंद्र
२४) अंग मेहनत
२५) आश्चर्य
२६) पोते
३०) नाश, तद्रूपता
३१) संगीतातील एक राग
३३) पण, परंतु (इं)
३५) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३७) त्वरित
३९) दर्पण
४०) जमीनदाराचा नोकर
४२) ढीग
४६) कमळ
४८) अंगातील मस्ती
४९) वास, मुक्काम
५१) शंभर
५३) सिंह
५५) भेग , चीर
५६) कडक व चिवट
५८) संन्यासाचे निवासस्थान
६०) पोरका, आधार नसलेला
६३) गीत
६४) सुकुमार
६६) नाश पावलेला भाग
६८) युद्ध
७०) पराभव, माळ
७२) कशा प्रकारचा
७३) मनाला टोचणारे दु:ख
७५) पुष्परस

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# या जागतिक सायकल दिनी, सोनी सबचे कलाकार सांगत आहेत, सायकल चालवल्याने त्यांना कसे रीचार्ज झाल्यासारखे वाटते!

**मुंबई, २ जून :** या जागतिक सायकल दिनी, सोनी सबचे उत्साही कलाकार शब्बीर अहलूवालिया, नवीन पंडिता, शीहान कपाही आणि देशना दुगड सांगत आहेत, सायकल चालवून मिळणाऱ्या मौज, फिटनेस आणि स्वातंत्र्याविषयी. या कलाकारांसाठी सायकल हे केवळ प्रवास करण्याचे साधन नाही, तर सायकल चालवणे हा त्यांचा आवडीचा विषय आहे, ज्याच्यामुळे त्यांच्या शरीराला ऊर्जा मिळते, मन स्वच्छ होते आणि व्यक्त जीवनात एक वेगळाच आनंद मिळतो. शब्बीर तर सेटवरच सायकल घेऊन येतो, किंवा नवीन सायकलवरून लांब फेरफटका मारून निसर्गाचा आनंद घेतो, देशना स्क्रीन-टाइम टाळून सायकल चालवत स्वत:मध्ये रमते तर शीहानची सायकलशी निगडीत एक हृदयस्पर्शी आठवण आहे. प्रत्येक जण सांगत आहे की, सायकल हा कसा त्यांच्या जीवनातील एक अर्थपूर्ण भाग बनला आहे. बघू ते काय सांगताहेत-

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगची भूमिका साकारत असलेला शब्बीर अहलूवालिया म्हणतो, माझ्यासाठी तर सायकल गेमचेंजर आहे. मी आठवड्यातून किमान दोन वेळा सायकलवरूनच सेटवर येतो. त्या दिवशी माझे जाऊन येऊन ४0-४५ किमी. सायकलिंग होते. तो एक उत्तम व्यायाम तर आहेच पण सायकलिंग माझे मन स्वच्छ करते. माझी ऊर्जा चांगली ठेवते आणि दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने होते. सायकल शहरातील रस्त्यांवरून चलवायची असो किंवा रमणीय रस्त्यांवरून फिरायचे असो, सायकल चलविताना मला स्वच्छंद वाटते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विनची भूमिका करत असलेला नवीन पंडिता म्हणतो, माझ्यासाठी सायकल चालवणे हा केवळ व्यायामाचा एक प्रकार नाही, तर ती एक दुचाकी थेरपी आहे. शूटिंगच्या धकाधकीत आणि शहरातल्या गजबजाटात सायकल चालवल्याने माझे मन साफ आणि संतुलित होते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत राशी पटेल ही व्यक्तिरेखा साकारणारी देशना दुगड म्हणते, मला माझ्या मोठ्या भावाने सायकल चालवायला शिकवली आणि मला जमल्यानंतर मी माझ्या खास मैत्रिणीला शिकवली. आम्ही सकाळी सकाळी किंवा शिकवणीनंतर सायकल चालवत मैत्रिणींना भेटायला जायचो किंवा कधी तरी काही खायला जायचो. माझ्याकडे दोन सायकली आहेत- त्यातली एक गियरची आहे. मी हे अभिमानाने सांगू शकते की मी कोणत्याही पोशाखात- साडी, ड्रेस किंवा सूटमध्ये सायकल चालवू शकते. सायकल चालवताना मला खूप मोकळे वाटते, जणू बिना-पंखाने मी उडत असते! सायकल मला स्क्रीन, अभ्यास किंवा तणाव यापासून सुटका मिळवून देते.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत अथर्व वागले ही व्यक्तिरेखा साकारणारा शीहान कपाही म्हणतो, मला पहिल्यापासून सायकल चालवायला खूप आवडते. सायकल चालवताना मला खूप स्वच्छंदी वाटते. माझी लहानपणीची एक गोड आठवण म्हणजे मी माझ्या बहिणीसोबत सायकल चालवतो आहे आणि माझे वडील आमच्या बाजूने जॉगिंग करत आहेत. मला आठवते आहे, त्या दिवशी अचानक पाऊस सुरू झाला होता. पण मागे फिरण्याऐवजी आम्ही सायकलिंग आणि जॉगिंग करत राहिलो! मी पडू नये म्हणून माझ्या वडिलांना त्यांचा एक हात पूर्ण वेळ माझ्या मानेच्या मागे ठेवला होता. आम्ही सगळे चिंब भिजलो होतो. खूपच मजा आली होती.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस कौटुंबिक समस्या दूर करणारा असेल. जोडीदारासोबत सुखद क्षण अनुभवाल. अध्यात्मिक ओढ वाढेल. धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**वृषभ :** आजचा दिवस सामान्य राहील. भावंडांसोबत संबंध सुधारतील. रस्त्यावर चालताना सावधगिरी बाळगा. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडचणी दूर होतील. शालेय उपक्रमात सहभागी व्हाल.

**मिथुन :** आजचा दिवस आनंददायी असेल. हल्लीच लग्न झालेल्यांना वैवाहिक जीवनात मधुरता आणि कुटुंबासोबत सुखद वेळ अनुभवायला मिळेल. खाद्यपदार्थ व घरगुती वस्तूंवर खर्च होईल.

**कर्क :** व्यावसायिकांना कार्यक्षेत्रात प्रगतीची संधी मिळेल, पण अपूर्ण कामे पूर्ण करा. गृहिणींवर कामाचा बोजा वाढेल. आरोग्याची काळजी घ्या. एखादा जुना आजार अचानक डोकं वर काढेल.

**सिंह :** जुन्या मित्रांच्या भेटीगाठी होतील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. कोणावरही अतिविश्वास ठेवू नका. नकारात्मक विचार टाळल्यास मार्ग सुकर होईल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**कन्या :** सकारात्मक विचारांनी दिवसाची सुरुवात करा. आजचा दिवस चांगला जाईल. कार्यालयीन कामासाठी प्रवासाचे योग संभवतात. प्रवासात अनोळखी व्यक्तींच्या भेटीगाठीमुळे जीवनशैली बदलेल.

**तुळ :** आज व्यवसायात नुकसान होण्याची चिन्हे आहेत. तुम्ही दिवाळखोरीत जाऊ शकता. कर्ज घेण्याचे प्रयत्नही निष्फळ ठरतील. वाचवलेले भांडवल निरुपयोगी कामांवर अधिक खर्च केले जाईल.

**वृश्चिक :** आरोग्याच्या समस्या दूर होतील. परीक्षेची तारीख पुढे गेल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल. अपेक्षित कामात यश मिळेल. वाहन खरेदीचा विचार तूर्तास पुढे ढकला.

**धनु :** आजचा दिवस अनुकूल असून व्यापारात अचानक धनलाभ संभावतो. उधार व्यवहार टाळा. जोडीदाराच्या मदतीने कौटुंबिक मतभेद मिटतील. एकत्र भोजनाचा योग आहे. मुलांमध्ये उत्साह असेल.

**मकर :** आज तुम्ही मालमत्तेशी संबंधित कामात कठोर परिश्रम केल्यास तुम्हाला यश मिळेल. आईकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात कठोर परिश्रम केल्याने अपेक्षित लाभ मिळेल

**कुंभ :** कुटुंबाचे पूर्ण सहकार्य लाभेल. घरातील कामात मदत मिळेल. प्रवासाची योजना आखा. मित्र-मैत्रिणींच्या भेटीने मन प्रसन्न होईल. नोकरदारांची अनुकूल ठिकाणी बदली होईल. प्रवासाचा त्रास जाणवेल.

**मीन :** कामाच्या ठिकाणी नवीन बदल होऊ शकतात. विद्यार्थी व महिलांसाठी आजचा दिवस लाभदायक आहे. मनोबल उत्तम राहील. अविवाहितांसाठी विवाहाचे योग येतील.

# ६७७८ स्त्रोत, तरीही मासेमारांची हेळसांड

**गोंदिया :** लाव, वनसंपदा आदी असलेल्या गोंदिया जिल्ह्यात पारंपारिक व्यवसाय मोडकळीस येऊ लागले आहे. यासाठी शासन, प्रशसनाचा उदासिन कारभार जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात दूध, पशुपालन व्यवसायानंतर मत्स्य व्यवसायही आता संकटात सापडला आहे. शासकीय अनास्थेमुळे मत्स्य व्यवसायासाठी जिल्ह्यात ६७७८ अनुकूल स्त्रोत असून १३३ मत्स्यपालन संस्था डबघाईस आल्या आहेत. गोंदिया जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या जिल्ह्यात एकेकाळी मत्स्य व्यवसायाला अच्छे दिन होते. विशेषतः जिल्ह्यातील ढिवर, कहार व इतर जातीचे ९० टक्के कुटुंब या व्यवसायावर अवलंबून होते. मात्र दिवसेंदिवस शासन व प्रशासनाच्या उदासिन कारभारामुळे मत्स्य व्यवसाय जिल्ह्यात संकटात येऊ लागला आहे. जिल्ह्यात पर्याप्त भूजल मत्स्य व्यवसायासाठी स्त्रोत आहे. मात्र या व्यवसायाच्या वाढीसाठी शासन व प्रशासनाकडून राबविण्यात येणारे उपक्रम फक्त नावापुरतेच ठरत आहे. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेले लाखो कुटूंब पारपारिक व्यवसायाला दुरावून कामाच्या शोधात भटकंती करीत आहे. जिल्ह्यात मत्स्य व्यवसायासाठी ६ हजार ७७८ तलाव, सरोवर, जलाशय आहेत. यामध्ये तिरोडा तालुक्यातील ९५१ क्षेत्र, गोरेगाव ९३६, गोंदिया १२९३, आमगाव ६०४, सालेकसा १२५०, सडक अर्जुनी ४२०, अर्जुनी मोरगाव ५६३, देवरी ७६१ क्षेत्र मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल आहे. तसेच मत्स्य व्यवसाय करण्यासाठी जिल्ह्यात मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात मत्स्य व्यवसाय केला जातो.

# कचऱ्यापासून गांडुळ खताची निर्मिती

## सुमधुर संगिताच्या ध्वनित कचरा संकलन

**तिरोडा :** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगर परिषद तिरोडा येथील ओझोन घंटागाडी सुमधुर संगिताच्या ध्वनित सकाळ सकाळी नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या वार्डावार्डात फिरत असते व घरोघरी दारासमोर थांबवून सुका कचरा व ओला कचरा संकलन करीत असते. ओझोन घंटागाडीच्या निळया रंगाच्या डब्यात सुका कचरा तर हिरव्या रंगाच्या डब्यात ओला कचरा जमा केला जातो, त्यानंतर हा संपूर्ण कचरा डंपिंग यार्ड भिवापूर येथे एकत्र केला जातो, ओला कचरा जमा करण्यासाठी सहा टाक्या तयार करण्यात आलेल्या असून त्या कचऱ्यापासून गांडूळ खताची निर्मिती केली जाते आहे. तो गांडूळ खत नगर परिषद हद्दीतील शहरातील विविध भागात वृक्षारोपण केलेल्या झाडांना व गार्डन मधील झाडांच्या उपयोगात ऊत्तम खत झाडाच्या संवर्धनासाठी व वृक्ष वाढीसाठी वापरला जात आहे.



नगर परिषद तिरोडा येथे आरोग्य विभागाकडे ५ रिक्षा घंटागाडी, ४ कायजन (ओझोन घंटागाडी), २ ट्रॅक्टर स्वच्छतेसाठी उपलब्ध असून याद्वारे शहरातील सर्व वार्डातील घराघरातील कचरा जमा करणे, नाली साफसफाई, रोड साफसफाई या सर्व कचर्याची नियमितपणे विल्हेवाट लावली जाते, अशाप्रकारे नगर परिषद तिरोडा येथील आरोग्य विभाग अत्यंत गंभीरतेने आपले कार्य करीत असते, या कामगीरीवर शहरवासीयांना समाधान असल्याचे बोलले जाते. स्वच्छतेसाठी नियमितपणे ब्लिचींग पावडर, नाली साफसफाई झाल्यावर मलेरीया आईल, पावसाळा लागण्यापूर्वी फॉगींग मशिन द्वारे मच्छर मारण्यासाठी फवारणी सकाळ संध्याकाळ दोन दोन तास तिरोडा नगर परिषद क्षेत्रात होते, सुमधुर संगिताच्या ध्वनित कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीची वाट नागरिक मोठ्या उत्सुकतेने बघत असतात हे विशेष.

**नगर परिषद तिरोडा अंतर्गत शहरातील संपूर्ण वार्डातील घरातील ओला व सुका कचरा घंटागाडी च्या माध्यमातून नियमितपणे संकलीत करून नपच्या भिवापूर येथील डंपिंग यार्ड मध्ये विल्हेवाट लावली जाते, नाली साफसफाई व रोड साफसफाई कडे आरोग्य विभाग लक्ष देत असतो, कोणत्याही वार्डातून स्वच्छतेसाठी भ्रमणध्वनी वरुन सुचना मिळाल्यास तात्काळ कारवाई केली जाते, यामध्ये मला व माझ्या विभागातील कर्मचार्यांना देशसेवा करीत असल्याचा आनंद होतो.**
**– मनोज लारोकर, आरोग्य विभाग**
**नगर परिषद तिरोडा**

### खतापासून मिळतो न.प.ला भांडवल

नगर परिषद तर्फे ओझोन घंटागाडीच्या माद्यमातून शहरातील ओला कचरा, सुखा कचरा संकलन केले जात आहे.व त्या कचऱ्यांपासून गांडुळ खत तयरा करून उपायगात आणला जात आहे. तसेच शिल्लक राहीलेल्या गांडूळ खत २ रुपये किलो प्रमाणे विक्रीसुद्धा केली जाते. वाळलेला कचरा सात बॅरीगेट मध्ये गोळा केला जातो त्यामध्ये प्लास्टिक, काच, चमडा, कागदं अशा विविध टाकाऊ पदार्थांना वेगवेगळे करून बाहेरच्या कंपनीत पाठविले जाते, त्यापासून सुद्धा दरमहा सरासरी ५ हजार रुपये च्या आसपास नगर परिषदेला भांडवल मिळत असते.

## Meeues e efJe¯eeL ee



**गोंदिया :** नजिकच्या जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा फुलूचर येथे शहीद सागर रतिराम राऊत यांच्या पुण्यतिथी निमित्त राऊत कुटुंबाकडून शालेय विद्यार्थ्यांना पाण्याटी बॉल व बिस्कटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शहीद सागर राऊत यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शा.व्य.स. अध्यक्ष सौ. वनमाला मेश्राम, अशोक चन्ने, उर्मिला रहमतकर, होलुराम सव्वालाखे, ईरशाद शेख, पप्पू गौतम, अवि रहांगडाले, संजय हिरापुरे, किरण राूत, रंजू जोशी, बी. एस. कठाणे, विनेश राूत, बालू चामलाटे आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार



**गोंदिया :** गोंदिया जिल्हा पोलिस दलात कार्यारत पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आज ३१ मे रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या उपस्थित सेवानिवृत्ती सत्कार करण्यात आले. दरम्यान उपनिरिक्षक गोपाल कापगते, उपनि. विनायक पुडो, पोलिस अंमलदार आनंदराव करमकर यांचा शाल, श्रीफळ, रोपटे व सेवानिवृत्ती प्रमाणपत्र, भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रभारी पोलिस उपअधीक्षक नंदिनी चानपुरकर तसेच पोलिस अधिकारी, अंमलदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पोलिस उपअधीक्षक चानपुरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पो.हवा. राजु डोंगरे, राज वैद्य यांनी सहकार्य केले.

# मासिक पाळी ही नैसर्गिक क्रिया : नंदागवळी

## तिरोडा तालुक्यात जनजागृती कार्यक्रम

**तिरोडा :** २८ मे रोजी जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिन साजरा केला जातो. हा दिवस मासिक पाळी आणि त्या संबंधित स्वच्छतेच्या महत्त्वावर जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी मासिक पाळीच्या काळात महिलांना होणाऱ्या समस्या आणि स्वच्छतेचे महत्त्व यावर चर्चा करून जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती तिरोडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दर्शना नंदागवळी यांनी आजच्या दिनी दिली आहे.



तिरोडा तालुक्यात आरोग्य विभागाच्या वतीने बुधवारी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. डॉ. दर्शना नंदागवळी म्हणाल्या, भारतीय समाजात आजही मासिक पाळीविषयी संकोच, अंधश्रद्धा आणि अशास्त्रीय कल्पना खोलवर रुजलेल्या आहेत.

युनिसेफच्या अहवालानुसार, भारतातील सुमारे २३ टक्के मुली मासिक पाळी सुरू झाल्यानंतर शाळेत न जाता शिक्षण सोडतात. अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहे नसतात. परिणामी त्यांचे शिक्षण खंडित होते आणि त्या भविष्यातील संधी गमावतात. असंघटित क्षेत्रातील महिलांची परिस्थिती आणखी गंभीर आहे. बांधकाम, शेती, वीटभट्टी, घरकाम यांसारख्या ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना मासिक पाळीच्या काळात विश्रांती, स्वच्छतेची साधने किंवा वैद्यकीय मदत सहज उपलब्ध होत नाही. काम चुकवले तर त्यांना मजुरीदेखील नाकारली जाते. त्या कधी अर्धवट काम सोडून परततात, तर कधी त्याही परिस्थितीत काम करीत राहतात, परिणामी त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात येत असल्याचे सांगितले.

काळजी घेणे गरजेचे

२३ टक्के मुली मासिक पाळी सुरु झाल्यानंतर शाळेत न जाता शिक्षण सोडतात. पीरियड्स अथवा मासिक पाळी ही प्रत्येक मुलगी, तरुणी व स्त्रियांच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक महिलेला आयुष्यातील काही वर्षे नियमितपणे याचा सामना करावा लागतो. काहींना या काळात खूप त्रास होतो. पण मुख्य म्हणजे मासिक पाळीच्या त्या चार-पाच दिवसांत आरोग्याची व एकंदर स्वच्छतेची काळजी घेणे अतिशय गरजेचे असते. या दरम्यान महिलांनी काही निष्काळजीपणा केल्यास आरोग्याच्या अनेक समस्या उ ?द्भवू शकतात.

# स्वतःवर विश्वास ठेवा, यशस्वी व्हा! : खा. डॉ. किरसान

**गोंदिया :** यश मिळविण्याचा मार्ग अत्यंत खडतर आहे. या खडतर मार्गाचा प्रवास करताना जिद्द कायम ठेवायची. स्वतःवरचा विश्वास कायम ठेवायचा. तो तुटू द्यायचा नाही. या विश्वासाच्या जोरावर अथक परिश्रमातून तुम्ही यशाची शिखरे गाठू शकता. त्यामुळे स्वतःवर दृढ विश्वास ठेवा, यशस्वी व्हा, असे प्रतिपादन खा. डॉ. नामदेव किरसान यांनी केले.

गोविंदराव फाउंडेशनच्यावतीने येथील लकी लॉन सभागृहात आयोजित पदवीधर रोजगार मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. ॲड. अभिजित वंजारी होते. मंचावर शिक्षक आ. सुधाकर अडबाले, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष वंदना काळे, काँग्रेसच्या ओबीसी सेलचे अध्यक्ष जितेंद्र कटरे, दुष्यंत किरसान, माजी सिनेट सदस्य शकील सत्तार, जॉब कनेक्टचे रघुराम गायकवाड उपस्थित होते. यावेळी आ. ॲड. वंजारी यांनी कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची अनेक क्षेत्रात आवश्यकता आहे. मात्र, कंपन्या योग्य व्यक्तीपर्यंत अथवा संबंधित व्यक्ती कंपन्यांपर्यंत पोहचू शकत नाही. या दोहोंमधला दुआ बनण्याचे कार्य पदवीधर रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून गोविंदराव वंजारी फाऊंडेशन करीत आहे. राज्यभरातील विविध नामांकित कंपन्या एकाच ठिकाणी आणून रोजगार उपलब्ध करून देण्याची संधी आम्ही उपलब्ध करून दिली असल्याचे त्यांनी सांगितले. आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर गोंदिया जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या विविध कंपन्यांनी मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तेथेच नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य उषा सहारे, जि.प. सदस्य विमल कटरे, तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष अनिता मुनेश्वर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सविता बेदरकर, सामाजिक कार्यकर्त्या दिव्या भगत आदी उपस्थित होते.

## कंत्राटी कामगार शाखेची कार्यकारिणी गठित

**गोंदिया :** स्वतंत्र म्युनिसिपल कंत्राटी कामगार शाखेची कार्यकारिणी रविवारी गठित करण्यात आली. स्थानिक विश्रामगृहात राज्याचे वरिष्ठ पदाधिकारी गणेश उके यांच्या अध्यक्षतेत नागपूर जिल्हाध्यक्ष दिनेश बोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारिणी जाहीर झाली. यात अध्यक्षपदी पंकज सोनेकर, उपाध्यक्ष रजा सोलंकी, रिना रहीले, सचिव निरज श्यामराव सूर्यवंशी आदींचा समावेश आहे.

# सर्व्हर डाउनमुळे ११ वीची प्रवेश प्रक्रिया रखडली

## पालकांसह विद्यार्थ्यांची वाढली चिंता

गोंदिया : दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होताच विद्यार्थी अकरावीत प्रवेश घेण्यासाठी गर्दी करू लागतात. नवीन शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी अकरावीत प्रवेश प्रक्रिया सोमवारी (दि. २६) पासून ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली आहे, परंतु वारंवार वेबसाइट सर्व्हर डाउन होत असल्याने, ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी एक नवीन समस्या बनत आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांना घाम फोडला.

यावर्षी अकरावीत प्रवेश प्रक्रिया ऑनलाइनद्वारे सुरू करण्यात आली आहे. २६ मे ते ३ जून पर्यंत, विद्यार्थ्यांना सरकारने दिलेल्या वेबसाइटचा वापर करून प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी करावी लागत आहे. जेव्हा विद्यार्थी कॅफे किंवा नोंदणीकृत महाविद्यालयांमध्ये जाऊन नोंदणी प्रक्रियेसाठी जातात तेव्हा त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. कधी वेबसाइटची लिंक उघडते आणि कधीकधी उघडण्यास १० ते १५ मिनिटे लागतात. लिंक पुन्हा बंद होतात. प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात लॉगिन केले जाते. परंतु



प्रक्रियेच्या दुसऱ्या टप्प्यात, तोच लॉगिन बंद असल्याचे दाखवले जाते. जरी एखाद्या विद्यार्थ्यांचे शुल्क भरले असले तरी, प्रक्रियेच्या दुसऱ्या टप्प्यात, या वेबसाइटवर शुल्क भरले गेले नसल्याची चर्चा आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**देवरी :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त देवरी तालुका भा.ज.प. व आमदार संजय पुराम यांच्या वतीने देवरी नगर पंचायत अंतर्गत येत असलेले शासकीय व निमशासकीय शाळा येथील २०२४-२०२५ सत्रातील वर्ग १० वी व १२ वर्गातील उत्तीर्ण प्रथम व द्वितीय विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नगर पंचायत देवरीच्या वतीने येथील आफताब मंगल कार्यालयात गुरूवार (२९ मे ) रोजी दुपारी ३.०० वाजता नगर पंचायत सभागृहामध्ये आयोजीत करण्यात आला होता.

या कार्यक्रमात एकुण ३७ गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा व शिक्षकांचा सत्कार शाल, श्रीफळ, शिल्ड व प्रमाणपत्र देऊन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी.नगर पंचायत देवरी चे नगराध्यक्ष संजू शेषलाल उईके, उपाध्यक्ष प्रज्ञाताई प्रमोद संगीडवार, सभापती संजय रतीराम दरवडे, सभापती सिता प्रकाश रंगारी, सभापती, कौशल्याबाई नारायण कुंभरे, नगरसेविका, तनुजा दिनेश भेलावे, कमल देवानंदजी मेश्राम, पिंकी पारस कटकवार, नगरसेवक, सरबजितसिंग प्रितमसिंग भाटिया, शकीलखान महेमुदखान कुरेशी (स्विकृत) नगरसेवक आणि नगर पंचायतचे मुख्याधिकारी तसेच अधिकारी व कर्मचारी वृंद हे प्रामुख्याने उपस्थित होते. यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# राघोजी भांगरे गुणगौरव सोहळा व उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा समारोप



**गोंदिया :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत आयोजित उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा समारोप व 'राघोजी भांगरे' गुणगौरव सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन कक्षात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना अनुक्रमे १० हजार रुपये, ७ हजार रुपये, ५ हजार रुपये रोख रक्कम बक्षीस स्वरूपात देण्यात आली. १०० टक्के निकाल देणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापकांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. पुराम, प्रमुख अतिथी आ. राजकुमार बडोले, जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे, जिल्हाधिकारी प्रजीत नायर तसेच विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासकीय, माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या शाळा, बोरगाव येथे १ मे ते ३१ मे २०२५ या कालावधीत उन्हाळी सराव शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, मेहंदी, क्ले-आर्ट, पेंटिंग, संगीत, बांबू आर्ट, ॲथलेटिक्स यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमात इयत्ता १० वी व १२ वी मध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना 'राघोजी भांगरे' गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना अनुक्रमे १० हजार रुपये, ७ हजार रुपये, ५ हजार रुपये रोख रक्कम बक्षीस स्वरूपात देण्यात आली. १०० टक्के निकाल देणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापकांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये सुप्त असलेल्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या बौद्धिक व नैतिक विकासाला चालना मिळावी, यासाठी गुणगौरव सोहळा व उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, असे मत प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केले.

# पोवार प्रगतिशील मंचची कार्यकारिणी गठीत



**गोंदिया :** स्थानिक पोवार प्रगतिशील मंचची निवडणूक १८ मे रोजी पार पडली. १५ संचालकांसाठी झालेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे १२ तर प्रगती विकास पॅनलचे ३ संचालक निवडणूक आले होते. आज ३१ मे रोजी स्थानिक पोवार बोर्डिंग येथे समाजाचे वरिष्ठ झामसिंग बघेले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत कार्यकारिणी गठीत करण्यात आली. कार्यकारणीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते उकराम बिसेन यांची निवड करण्यात आली.

आज पार पडलेल्या सभेच्या नवनियुक्ती कार्यकारिणीचे गठण करण्यात आले. अध्यक्षपदी उकराम बिसेन, उपाध्यक्ष लिलाधर पटले, सचिव हुपेंद्र बोपचे, कोषाध्यक्ष योगेश ठाकरे, सहसचिव सौ.उर्मिला रहांगडाले, संघटन सचिव दिपक देशमुख तर प्रचार सचिवपदी ॲड. रजत ठाकुर यांची नियुक्ती करण्यात आली. तर नवनियुक्ती संचालकांमध्ये ॲड. पृथ्वीराज चव्हाण, ॲड. टी. बी. कटरे, ॲड. योगेश रहांगडाले, विश्वनाथ पटले, अजय रहांगडाले, सौ. उपमा गौतम, सौ. धनीषा कटरे, छनेश चव्हाण यांचा समावेश आहे. आयोजित सभेचे अध्यक्ष यांनी समाज हितासाठी कार्य करण्याचे आवाहन नियुक्ती कार्यकारिणीला केले. यावेळी पुर्व अध्यक्ष संजय रहांगडाले, गुलाब बोपचे, कैलाश हरिणखेडे, राजेश चव्हाण, राजु बोपचे, सुरेश पटले, प्रवीण बिसेन, राजेश बिसेन, बाबा बिसेन आदी मान्यवर उपस्थित होते. आयोजित सभेचे संचालन पोवार स्वर्गरथ सेवा समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद ठाकरे यांनी केले तर सभेचे आभार नवनियुक्ती अध्यक्ष उकराम बिसेन यांनी मानले.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
No-MAHMAR2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)




# प्रतिक्षा संपन्न हिरवाईची

**उन्हाळ्याचं अखेरचं पर्व सुरू होतं ना होतं तोच आपल्याला पावसाचे वेध लागतात. पांढऱ्याधोट ढगांच्या कडा काळसर होऊ लागताच मनाचे कोपरे उजळू लागतात. एखाद्या-दुसऱ्या वळिवाने काहिली शमतेच त्याचबरोबर उष्णावलेल्या क्लांत तनातही ओलावा पाझरू लागतो. हा पाझर केवळ पावसाचाच नसतो तर त्यापाठोपाठ येणाऱ्या समृद्धी आणि निसर्गभक्तीचा असतो. करू या अशाच एका संपन्न हिरवाईची प्रतीक्षा...**



पावसाळ्यातील निसर्ग वेडावून टाकणारा... निसर्गाच्या नव्हे तर माणसामाणसाच्या कुडीत पंचप्राण फुंकणारा... पावसानंतर सर्वदूर पसरणारी ओल सर्जनाचं दान देतेच त्याचबरोबर मलूल झालेल्या जीवनेच्छेनालाही नवे धुमारे फुटू लागतात. चैतन्याचं नवं पर्व सुरू होतं ते याच पावसामुळे. आता उन्हाळ्याचं अखेरचं चरण सुरू आहे. लवकरच वणवे शमवणाऱ्या सरी बरसतील आणि सर्वदूर तृप्तीचे ओहोळ बागडू लागतील. आता सर्व प्राणीमात्रांना या तृप्तीची प्रतीक्षा आहे. पावसाळ्यात निसर्गाचं दिसणारं मनोहारी रूप निसर्गपूजकांच्या, निसर्गभक्तांच्या डोळ्यासमोर तरळू लागलं आहे. बळीराजा काळ्या आईच्या दिमतीस सज्ज होत आहे. सध्याचे वळीव पावसाच्या आगमनाची सुवार्ता घेऊन येत आहेत. तेव्हा आणखी थोडी प्रतीक्षा सहन करू या आणि सज्जता करू या एका संपन्न ऋतूपर्वाच्या आरंभाची...

निसर्ग हाच मोठा चमत्कार आहे. आपण यंत्र-तंत्राचा अंदाज घेऊन पावसाचा अंदाज वर्तवतो, पण केवळ आपल्यातच ही क्षमता आहे असं नाही तर वनस्पतींमध्येही ही निसर्गदत्त क्षमता बघायला मिळते. पावसाची चाहुल सर्वात अधिक वनस्पती आणि काही काही पशुपक्ष्यांना लागते हे आता सिद्ध झालं आहे. त्यामुळेच पावसाचा अंदाज वर्तवणाऱ्या अशा वनस्पतींचं जतन करणं आवश्यक आहे. पशू, पक्षी, वनस्पतींची वाढ, बहर यावरच पाऊस लवकर येणार की लांबणार हे सिद्ध होतं. हे संकेत ऋतूचक्राशी निगडीत असतात. पर्जन्य जवळ आल्याचा संकेत प्रथम पळस, कडूलिंबाकडून मिळतो. पावसाळा सुरू होण्याअगोदर करवंदाचा हंगाम जवळपास संपत आलेला असतो. जांभळाचा हंगाम ऐन मध्यावर असतो तर आमरसाची चंगळ असते.

पावसाळा जवळ आला की, पाकोळ्या निवाऱ्यासाठी सुरक्षित जागा शोधण्यात व्यस्त होतात. सुगरण नवीन खोप्यांच्या विणकामात मग्न असते. मुंग्या जमिनीत उबवणीस ठेवलेली अंडी झाडांच्या खोबणीत किंवा घराच्या माळावर अथवा अडगळीच्या सुरक्षित जागी ठेवण्यासाठी अहोरात्र धावपळ करत असतात. तेलमुंग्या, शिकारी मुंगळे बिळात दाणागोटा, रसद साठवताना आढळतात. पंख फुटून त्या सैरभैर उडताना दिसतात. आकाशात चंद्र, सूर्याकडूनही मान-सूनपूर्व संकेत मिळतात. ही सारी निसर्गाची बालकं आपल्याला पावसाच्या आगमनाची चाहूल लागल्याच संकेत देतात. हे निसर्गभक्त आपल्याला सूचित करतात. शेतकऱ्यांनी मशागतीसाठी सज्ज व्हावं, असाच जणू काही त्यांचा सल्ला असतो. निसर्गाची किमया किती अगाध आहे तेच यावरून सिद्ध होतं.

या संकेतांचा अभ्यास करणं आणि त्यानुरूप आपल्या कार्याचं नियोजन करणं ही बळीराजाची खरी निसर्गभक्ती ठरावी. आपल्या कृषीप्रधान

**भक्ती विशेष**

भारतात शेतीची एक ठराविक पद्धत अवलंबली जाते. पण त्याची उपयुक्तता आणि बदलाची गरजही समजून घेणं इष्ट ठरेल. पारंपारिक शेतीपद्धतीमुळे दिवसेंदिवस शेतजमिनी नापिक होत चालल्या आहेत. संपूर्ण जगात सुमारे २६० कोटी एकर जमीन नापिक झाली आहे. रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे जमीनाचा कस नष्ट होऊन ती ओसाड होते. हे टाळण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करणं क्रमप्राप्त आहे. पुढील काही काळात सेंद्रिय खतांचा वापर न केल्यास शेतजमिनी नापिक होतील.

सेंद्रिय खतांच्या किमती रासायनिक खतांच्या तुलनेने कमी असतात. या खतांच्या वा-परामुळे पिकांना अन्नद्रव्य मिळतातच पण त्याचबरोबर जिवाणुंच्या वाढीसाठीही ती सहाय्यक ठरतात. या खतांचं कार्य जमिनीत बराच काळ सुरू रहात असल्यामुळे फायदा मिळतो. या खतांच्या वापरामुळे उपयुक्त जिवाणुंची संख्या वाढत असल्यामुळे निसर्गातील नायट्रोजन आणि फॉस्फरस पिकांना योग्य प्रमाणात मिळतो. त्यामुळे हवेतील आर्द्रता शोषून घेऊन जमिनीची पाणी धरण्याची क्षमता वाढते. त्याचा परिणाम म्हणून जमिनीत सकस पिक उगवून येतं. पाण्याचं योग्य नियोजन केल्यास जमिनीची उत्पादनक्षमता आणि पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. वाढती गरज लक्षात घेऊन आता अशा प्रकारच्या खतनिर्मितीचे प्रकल्प विविध ठिकाणी उभे रहायला हवेत. तरच आपण काळ्या आईचं जतन आणि संवर्धन करु शकू. हीच खऱ्या अर्थाने तिची आराधना ठरेल. पूजा ठरेल.

●●●

## कौतुकास पात्र ठरण्यासाठी



कामाच्या ठिकाणी वरिष्ठांची मर्जी संपादन करणं गरजेचं असतं. करीअरमध्ये यशाचे टप्पे गाठणं असो किंवा बढती मिळवणं असो, वरिष्ठांवर प्रभाव टाकल्याखेरीज काहीही होत नाही. वरिष्ठांची मर्जी कशी संपादन करायची याबाबत चाणक्याने सांगून ठेवलंय. अर्थशास्त्रावरील त्याच्या पुस्तकात अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. कॉर्पोरेट जगात वावरताना चाणक्यनीतीतले हे उपदेश तुमच्या कामी येतील.

* कौतुकास पात्र ठरण्यासाठी मेहनत करा. कौतुक करण्यासारखं काम करा.
* योग्य सहकारी निवडा. मूर्खांच्या सहवासात राहू नका. तुम्हाला मार्गदर्शन करणाऱ्या, पुढे जाण्यासाठी मदत करणाऱ्या सहकार्यांची निवड करा.
* भविष्याचा विचार करा. आधीच कामाचं नियोजन करून ठेवा. कामाचं योग्य नियोजन करणारी, दूरदृष्टी असणारी माणसं वरिष्ठांच्या पसंतीस उतरतात.

**चाणक्यनीती**

* स्पष्टवक्ते बना. आर्थिक व्यवहार, ज्ञानार्जन, भोजन आणि व्यवसायात बुजरेपणा दूर सारणारी माणसं आनंदी असतात, असं चाणक्य सांगतो. व्यावसायिक आयुष्यात याचा अवलंब करा.
* कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न करा. ज्ञानासाठी पुस्तकांवर अवलंबून असणारी तसंच धन इतरांच्या ताब्यात असणारी माणसं गरजेच्या वेळी या दोन्ही गोष्टींचा वापर करू शकत नाहीत. त्यामुळे शिकण्याच्या बाबतीत कुपमंडूक वृत्ती नको. सतत ज्ञान मिळवत रहा.
* शिक्षण सर्वात महत्त्वाचं असल्याचं आणि सुशिक्षित माणसाला सगळ्या ठिकाणी मान मिळत असल्याचं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामात तरबेज व्हा. सगळी कौशल्यं आत्मसात करा.
* वरिष्ठांचा मान राखा. त्यांच्या मताचा आदर करा. आपलं म्हणणं जरुर मांडा पण वरिष्ठांचा अनादर करू नका.
* कामाच्या ठिकाणचे सहकारी आणि मित्र यांच्यातली लक्ष्मणरेषा ओळखा. काम करताना मैत्रीचा विचार करू नका. व्यावसायिक आणि वैयक्तिक नात्यांमध्ये अंतर ठेवा.
* नवं तंत्रज्ञान शिकून घ्या. बदलत्या जगात स्वत:मध्ये बदल न घडवणारा मनुष्य मूर्ख असतो असं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामाशी संबंधित ज्ञान वाढवत राहा.
* कामातल्या प्रगतीबाबत दवंडी पिटू नका. यश तुमच्यापुरतं मर्यादित ठेवा. वरिष्ठ नक्कीच कामाचं कौतुक करतील.

●●●

## कसं वागू नये?

आयुष्यात आनंद आणि यश मिळवायचं असेल तर काही गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. काही नियम पाळावे लागतात. आयुष्याच्या संघर्षात माणसाच्या हातून अनेक गोष्टी घडत असतात. त्यापैकी काही योग्य तर काही अयोग्य असतात. अजाणतेपणी हातून काही चुका होतात. याबाबतचा उल्लेख रामचरितमानस या ग्रंथात करण्यात आला आहे. रामचरितमानस मधील ओव्यांमधून याबाबत जाणून घेता येईल.

* रागु, रोषु, इरिषा, मदु, मोहु।
जनि जनि सपनेहू बस इन्ह के बस होहु।।
सकल प्रकार बिकार बिहाई।
मन क्रम बचन करेहु सेवकाई।।

याचा अर्थ राग म्हणजे एखाद्याच्या प्रती असणारा क्रोध, रोष म्हणजे नाराजी, मद म्हणजे अहंकार आणि मोह म्हणजे लालसा या अवगुणांचा अंमल व्यक्तीवर झाला की तिच्या शरीरात अनेक विकारांचा वास राहतो. असा मनुष्य मन, कर्म आणि विचारांनी याच विकारांचा गुलाम बनतो.

* अति तेथे माती असं म्हणतात. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. त्यामुळे प्रेमाचा अतिरेकही वाईटच ठरतो. अतिप्रेमामुळे आपण चांगल्या वाईटाचा निर्णय घेऊ शकत नाही. अतिप्रेमामुळे माणूस अधर्म करायला धजावतो. गुरू द्रोणाचार्य हे याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. पुत्र अश्वत्थाम्याच्या अतिप्रेमापोटी अधर्मी असल्याचं माहीत असूनही त्यांनी कौरवांना सहकार्य केलं. त्यामुळे अतिप्रेम किंवा मोह घातकच...

* रोष हादेखील माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. रागाच्या भरात माणूस अमानुष कृत्य करू शकतो. रागीट व्यक्तीला कशाचंही भान रहात नाही. असा माणूस राक्षसासमान वागू लागतो. रागात केलेल्या अनेक कृत्यांची मग लाज वाटू लागते. त्यामुळे रोष नियंत्रणात ठेवायला हवा.

* एखाद्याच्या प्रगतीबाबत ईर्ष्या करणारा माणूस आयुष्यात कधीच यशस्वी होत नाही.



समोरच्याला खाली पाडण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशा माणसांना कोणाचंही

**स्व मदत**

चांगलं बघवत नाही. दुर्योधन हे क्रोधामुळे होणाऱ्या विनाशाचं एक उदाहरण आहे. दुर्योधनाच्या मनात पांडवांबाबत ईर्ष्या होती. यामुळे तो पांडवांशी वाईट वागला. त्यांच्याविरोधात कटकारस्थानं केली. पण अंती त्याच्या कुळाचा नाश झाला.

* अहंकार हा सुद्धा माणसाचा शत्रू आहे. अहंकारी माणूस इतरांचे सल्ले मानत नाही. तो स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असतो. यामुळे माणसाचं बरंच नुकसान होतं. चुका न मानणं, इतरांना मान न देणं अशा कृत्यांमुळे अहंकारी माणूस इतरांच्या नजरेतून उतरतो आणि एकटा पडतो.

* कोणतीही वस्तू किंवा माणसाबद्दलचा अतिमोह घातक ठरतो. मोहात पडलेला माणूस चुकीचं पाऊल उचलतो. महाभारतातल्या धृतराष्ट्राचंच बघा. त्याला आपल्या मुलांचा आणि त्यातही दुर्योधनाचा मोह होता. या मोहामुळे त्याने कायमच मुलांना पाठीशी घातलं आणि यामुळेच त्यांच्या कुळाचा नाश झाला. म्हणून हे अवगुण दूर सारावे.

●●●

## कसं करावं 'हनुमान चालीसा'चं पठण?



हनुमान ही देवता बलदायी आणि भयनाशक आहे. मारूती स्तोत्र आणि हनुमान चालीस यांच्या नियमित पठणाने अनेक अडचणी आणि दोषांपासून मुक्ती मिळते तसंच हनुमंताची कृपा प्राप्त होते. हनुमान चालीसा पठणाचे काही नियम आहे. या नियमांचं पालन केल्यास भक्तांना अनेक लाभ होतात. हनुमान चालीसाचं पठण कसं आणि कधी करावं, याविषयी...

* रात्रीच्या वेळी हनुमान चालीसा या पोथीचं पठण केल्याने अनेक दोष दूर होतात. साडेसाती मागे लागली असेल तर या उपायामुळे शनीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

* मंगळवार आणि शनिवारी सकाळी हनुमान चालीसाचं पठण करणं लाभदायी मानलं जातं. हनुमान चालीसाच्या पठणाचे अनेक सकारात्मक प्रभाव दिसून येतात. यामुळे आरोग्य सुधारतं तसंच घरात समृद्धी आणि संपन्नता नांदू लागते. अनेक नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो.

* हनुमान चालीसाचं पठण सकाळी आणि रात्री करावं. रात्रीच्या वेळी आठ वेळा हनुमान चालीसा वाचल्यास साडेसातीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

**जाणून घ्या**

* हनुमानाची पूजा केल्याने शनीदेव प्रसन्न होतो. हनुमानाच्या भक्तांना शनीच्या कोपाचा त्रास होत नाही, अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे हनुमानाची आराधना करायला हवी. हनुमानाची आराधना करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे हनुमान चालीसा.

* हनुमान चालीसाच्या पठणाने भक्ताची सगळी पापं दूर होतात. हनुमंताची कृपा होते आणि जीवनात यश मिळतं.

●●●

## चीनमधला हिंदू धर्म


चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. या देशातले बहुसंख्य लोक बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. पण या देशात हिंदू धर्माच्या खुणाही आढळतात. प्राचीन काळात अनेक देशांमध्ये वैदिक धर्माचं अस्तित्त्व होतं. वैदिक धर्माची व्याप्ती बरीच मोठी होती.

**धर्म देशोदेशीचे**

चीनमध्येही हिंदू धर्माचं अस्तित्त्व अनेक ठिकाणी आढळतं. या देशातल्या लो यांग जिल्ह्यातल्या सुआन वू प्रांतात एक खांब आहे. या खांबावर संस्कृत भाषेतील मजकूर आढळतो. यावर वरपासून खालपर्यंत संस्कृत भाषेतले श्लोक कोरण्यात आले आहेत. हिंदू धर्मात यमराजाला मृत्यूची देवता मानलं जातं. यम हा मृत्यूलोकाचा राजा मानला जातो. चीनमध्येही अशा देवतेची कल्पना करण्यात आली आहे. यनमो वांग ही चीनमधली मृत्यूची देवता आहे. या देवतेचा यमाशी अगदी जवळचा संबंध आहे.

चीनमधल्या शिनमेन क्षेत्रातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिव मंदिराचे अवशेष आहेत. इथे आजही पाच फूट उंचीचं शिवलिंग अस्तित्त्वात आहे. शंकराचं मंदिर पूर्णपणे उध्वस्त झालं असलं तरी याच्या अस्तित्त्वाच्याा खुणा ठायीठायी आढळतात तसंच शहरातल्या भिंतींवर वैदिक धर्माशी संबंधित नकाशे आणि चित्रं कोरण्यात आल्याचं दिसून येतं. विशेष म्हणजे विनापत्य चीनी महिला अपत्यप्राप्तीसाठी या मंदिरात शंकराची पूजा करत असत. या मंदिराची निर्मिती तांग साम्राज्य काळात करण्यात आल्याचं बोललं जातं. चीनमधल्या तामिळ समुदायाने तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात मंदिराची डागडुजी केली होती. एकंदरच चीनमध्ये हिंदू मंदिरांच्या अनेक खुणा आढळतात.

●●●




## विंड चाईम निवडताना...

अनेक घरांमध्ये विंड चाईम लाव-तात. चीनी वास्तूशास्त्रात विंड चाईमचा वापर सौभाग्यवृद्धीसाठी केला जातो. विंड चाईममुळे हवेतल्या सकारात्मक लहरी घरात प्रवाही राहतात आणि घरातली संपन्नता टिकून राहते, असं मानलं जातं. विंड चाईमचे अनेक लाभ आहेत. अर्थात हे लाभ मिळवण्यासाठी त्याची निवड योग्य पद्धतीने करायला हवी. विंड चाईमची निवड कशी करायची, याविषयी...

* विंड चाईममुळे विशिष्ट प्रकारचा ध्वनी निर्माण होतो. या ध्वनीमुळे हवेतली ची ऊर्जा प्रभावित होते. ही ऊर्जा घरात सकारात्मक तरंग निर्माण करते. त्यामुळे विंड चाईमचा ध्वनी मधूर असला पाहिजे. हा ध्वनी घरातल्या प्रत्येक सदस्याला आवडायला हवा.

* धातूच्या विंड चाईम्स विकत घ्या. लाकूड किंवा प्लास्टिकच्या चाईम्सच्या तुलनेत धातूच्या चाईम्सचा आवाज अधिक तीव्र स्वरूपाचा असतो. यामुळे वातावरणातली ची ऊर्जा जलद गतीने सक्रिय होते.





* विशिष्ट प्रकारच्या अडचणी आणि समस्यांचं निवारण करण्यासाठी लाकूड किंवा मातीच्या चाईम्सचा वापरल्या जातात. पण मातीच्या चाईम्सची जास्त काळजी घ्यावी लागते. मातीची चाईम तुटल्यास अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता असते.

* विंड चाईम्स लावताना दिशेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. पूर्व आणि दक्षिण दिशा अधिक लाभदायी मानल्या जातात. पूर्वेकडे लाकडाच्या चाईम्स लावल्यास समृद्धी नांदू लागते.

**वास्तूभक्ती**

* विंड चाईमचा आकार ठरवताना जागेचा विचार व्हायला हवा. मोठ्या जागेत मोठ्या आकाराचं विंड चाईम असावं. छोट्या विंड चाईममुळे मोठ्या जागेतला प्रभाव कमी होऊ शकतो.

* गृहसजावटीसाठी विंड चाईमचा वापर करायचा असेल तर हवेशीर कोपऱ्याची किंवा दाराची निवड करा.

* घरात शांतता हवी असेल तर उत्तर, पश्चिम किंवा उत्तर-पश्चिम दिशेला धातूचं विंड चाईम लावा.

* सहा दांड्या असणारं विंड चाईम हॉलच्या उत्तर-पश्चिम कोपऱ्यात लावा. यामुळे सौभाग्यवृद्धी होते.

●●●

## जबलपूरचे शादीवाले हनुमानजी



हनुमानाला ब्रह्मचारी मानलं जातं. पण मध्य प्रदेशातल्या जबलपूरजवळच्या मंदिरातला हनुमान लग्नाचा आशीर्वाद देतो. लग्न व्हावं यासाठी या मंदिरात विवाहोत्सुक तरूण-तरूणींची गर्दी असल्याचं पहायला मिळतं. जबलपूरपासून २० किलोमीटर अंतरावर आगासौद नावाचं गाव आहे. या गावात हनुमानाचं मंदिर वसलंय. सिद्ध हनुमान मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. या हनुमानाला शादीवाले हनुमानजी असंही म्हटलं जातं. इथे येणाऱ्या लग्नाळू तरूणांच्या जोड्या जमतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. मंगळवार, गुरूवार आणि शनिवारी भाविकांची मोठी गर्दी असते.

**तीर्थक्षेत्र**

या हनुमानाकडे साकडं घातल्यानंतर तीन महिन्यांत विवाहोत्सुक तरूणांचा विवाह ठरतो, असं म्हणतात. सुखी वैवाहिक जीवनासाठी सिद्ध हनुमानाचे आशीर्वाद घेतले जातात. या हनुमानाला गुलाबाचं फूल अर्पण केलं तर नवस पूर्ण व्हायला फार वेळ लागत नाही, अशीही श्रद्धा आहे. गुलाबासोबत पिवळ्या कपड्यात बांधलेला नारळ हनुमानाला अर्पण करावा लागतो. त्यानंतर तीनदा मंदिरात यावं लागतं. यानंतर तीन महिन्यांच्या आता भक्ताचं लग्न ठरतं. लग्न ठरण्यासाठी इथे गुरूवारी यावं लागतं. पिवळ्या कपड्यातला नारळ, गुलाबाचं फूल आणि सुपारी अर्पण करताना कुलदेवतेचं स्मरण करावं लागतं. त्यानंतर हा सिद्ध मारूती तुमच्या मनोकामना पूर्ण करतो. या मारूतीला शादीवाले हनुमानजी हे नाव का पडलं, याबाबतचं गुपित आता उघड झालं असेल.

●●●

